श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

मासिक पुस्तक.

वर्ष १३ अंक ७,८,९ व १० भा.आ.का.व मा. शके १८५८

नलिनीदलगत जलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम् ।



क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका ॥

—शंकराचार्य.

COLLECTOR OF
1 - SEP 1938
BOMBAY

O. T.
30 SEP 1938

111
1938

संपादक:—रामचंद्र रामकृष्ण सामंत

# अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| श्री साईभक्तांस विज्ञप्ति ... ... ... ... | १—६ |
| कमिटीनें वर्तमानपत्रांतून साईभक्तांस केलेला खुलासा ... | ७—८ |
| कहाणीचा परिणाम (सत्यकथा) ... ... ... | ९—१५ |
| श्रीसाईनाथ कथा-करंडक (कथा ३ री) ... ... | १६—२१ |
| श्रीसाईसच्चरित अध्यात्मिक निरीक्षण ... ... | २२—३५ |
| श्री बाबांच्याजवळील गुरुगीता... ... ... ... | ३६—४० |
| त्रैवार्षिक निवडणुकीकरितां भ. मं. सभासदांची यादी ... | ४१—४४ |
| पुण्यतिथि उत्सवाचा कार्यक्रम ... ... ... | ४५—४८ |
| शिरडी संस्थान व विंचणकर मिळकतीसंबंधीं खुलासा... | ४९—५२ |
| श्रीसाईबाबांनीं निवारलेलें अरिष्ट ... ... ... | ५३—५६ |

# सूचना

स्थलाभावीं शके १८५६ व ५७ चे आढावे या अंकांत छापण्याचें राहून गेलें, ते त्या अंकांत जरूर छापले जातील. पुढील अंक १५।१।१।३७ रोजीं निघेल.

**संपादक**

# विनंती

वर्गणीदारांस नम्र विनंती करण्यांत येत आहे कीं, ज्यांनीं वर्गणी अद्यापि पाठविली नाहीं, त्यांनीं कृपा करून ती खालील पत्त्यावर पाठवून द्यावी अथवा V. P. करण्याचें तें कळवावें.

## श्रीसाईभक्तांस विज्ञप्ति

कोणाला श्रीसाईमहाराजांबद्दलचे त्यांचे स्वतःचे अनुभव श्रीसाईलीलेंत प्रसिद्ध व्हावे म्हणून पाठविण्याचे असतील त्यांनीं ते आमच्याकडे पाठविल्यास ते प्रसिद्ध होण्याबद्दल आदरपूर्वक योग्य तो विचार होईल.—**प्रकाशक**

कै. गोविंद रघुनाथ दाभोळकर अथवा अण्णासाहेब दाभोळकर कृत **श्रीसाईसच्चरित** किं. रु. ३॥.

Shri Sai Baba of Shirdi (A Glimpse of Indian Spirituality) in English, by Rao Bahadur M. W. Pradhan, Price Re. 1.

# श्रीसाईभक्तांस विज्ञप्ति

अलीकडे बहुतेक मराठी वर्तमानपत्रांतून श्रीसांईबाबा शिरडी संस्थान कमिटीचें काम नीट रीतीनें चालत नाहीं, तिच्या कारभारांत सावळागोंधळ असून तो अनागोंदी आहे अशा तऱ्हेचे चौदा कलमी आरोप केले जात आहेत. त्यामुळें सदर कमिटीच्या चालू कारभाराविषयीं भक्तमंडळींत निष्कारण गैरसमज पसरले जात असून लोकांची दिशाभूल होऊन संस्थानची वर्गणी वगैरे नेहमीप्रमाणें येण्याचें प्रमाण हल्लीं कमी झालें असून त्यामुळें संस्थानचें विनाकारण नुकसान होत आहे. म्हणून थोडासा खुलासा येथें देत आहोंत.

श्रीसांईबाबा शिरडी संस्थान कमिटी सन १९२२ सालीं अस्तित्वांत आली. तिचा कारभार कशा रीतीनें चालावा याजविषयीं अहमदनगर डिस्ट्रिक्ट कोर्टाची एक योजना Scheme असून त्याअन्वयें सदर कमिटीचे हिशेब सदर कोर्टास दरसाल सादर केले जातात. श्रीईसांबाबा संस्थानास सुरुवातीपासूनच तिच्या चालकांनीं लागू करून घेतलेल्या योजनेंतील ही हिशेबाची व्यवस्था गेल्या जुलईपासून अंमलांत आलेल्या नवीन कायद्यानें इतर सर्व धार्मिक संस्थांना लागू झाली आहे.

अशा तऱ्हेच्या संस्थांच्या कार्याधिकारी (मॅनेजिंग) कमिटया बहुधा स्थानिक असतात.परंतु साईबाबांचा भक्तगण फार लांबवर (कराची मद्रास) पसरलेला असल्यामुळें येथील कमिटीचें सभासदही मुंबई ते नागपूरपर्यंत दूरदूर राहणारे आहेत व ते वर्षांतून तीन्ही उत्सवप्रसंगीं शिरडी येथें जमतात. शिवाय श्री.बा. वि. देव रा. ठाणें व श्री. र. भा. पुरंदरे रा. वांद्रें हे शिरडी येथें महिनोमहिने राहून जें असेल तें संस्थानचें काम प्रत्यक्ष आपल्या देखरेखीखालीं अंगमेहनतीनें करितात. तसेंच प्रत्येक उत्सवप्रसंगीं वरील दोन भक्त

व श्री. सौ. वहिनीबाई गाडगीळ रा. पुणें अशाच तऱ्हेनें कामें पार पाडतात. व याबद्दल कमिटीनें केव्हांही या भक्तत्रयीचें ऋणी असलें पाहिजे.

कै. काकांसाहेब दीक्षित व कै. अण्णासाहेब दाभोळकर यांच्या मागें प्रशस्य कोशाध्यक्षाच्या ( ऑनररी खजिनदाराच्या ) जागेवर कै. बाबासाहेब तर्खड, रा. खार हे होते. तसेंच प्रशस्य सचिवाचें ( ऑनररी चिटणीसाचें ) काम श्री. सुंदरराव दि. नवलकर यांजकडे जुलई १९३० पासून असून त्यांनीं नुक्ताच फेब्रुवारी १९३७ मधें सदर जागेचा राजीनामा दिला व तो मंजूरही झाला आहे.

सुरुवातीपासून वेळोवेळीं कमिटीनें आपली बरीचशी शिल्लक रक्कम सरकारी रोख्यांत गुंतविली जावी अशा योजना केल्या व सन १९३२ सालीं चालू शिल्लक इं. बँकेंत चालू खात्यांत अगर सेविंग बँकेंत राहात जावी असें ठरविलें. बँकेंतून रक्कम काढते वेळीं कोशाध्यक्ष ( खजिनदार ) यांस आपले सहीशिवाय विश्वास्तांपैकीं ( ट्रस्टींपैकीं ) रावबहादुर प्रधान अगर श्री. देव यांजपैकीं एकाच्या तरी सहीची आवश्यकता ठेविली होती. पैकीं रा. ब. प्रधान हे खार नजीक सांताक्रूझ येथेंच रहात असल्यमुळें कै. तर्खड यांच्या हयातींत श्री. देव यांना एकही सही करण्याचा प्रसंग आला नाहीं व त्यांनीं या कामांत ढवळाढवळ केलीही नाहीं. शिवाय वरील बाबतींत बँकेबरोबर जो पत्रव्यवहार वगैरे व्हावयाचा, तो प्रशस्य सचिव ( ऑनररी सेक्रेटरी ) श्री. नवलकर यांजबरोबर व्हावयाचा अशी व्यवस्था होती. एणेप्रमाणें शिलकेच्या बाबतींतील कमिटीची कामगिरी पूर्णपणें खजीनदार, निदान एक विश्वस्त व चिटणीस या तिघांवर सोंपविली गेली होती. दिल-गिरीची गोष्ट अशी आहे कीं, इतकी चोख व्यवस्था असून गेलीं २।३ वर्षे माजी कोशाध्यक्ष खजिनदार यांच्या हातीं किती मोठ्या रकमा आहेत याजकडे लक्ष न देतां बँकेंतून पुन्हा रकमा काढून संस्थानचा खर्च होत गेला व माजी कोशाध्यक्ष ( खजिनदार ) यांच्या हातीं बरीच मोठी रक्कम राहिली गेली. व आज त्यांच्या मृत्यूनंतर म्हणजे ता. ९।६।३६ नंतर एक वर्ष होऊन गेलें, तरी त्यांपैकीं कांहींही रक्कम वसूल झालेली नाहीं.

अशा रीतीनें माजी कोशाध्यक्ष (खजिनदार) यांच्या हातीं मोठी रक्कम शिल्लक राहात आहे असें माजी सचिव (चिटणीस) यांच्याही ध्यानीं आलें नाहीं. त्यांनीं जानेवारी १९३६मध्यें एक गुप्त ( confidential) सर्क्युलर काढून कमिटीच्या सभासदांस कळविलें कीं, 'साईबाबा शिर्डी संस्थानची सांपत्तिक स्थिति तिच्या उत्पन्नाच्या मानानें आशाजनक नाहीं व ही स्थिति येण्यास ज्यास वाटेल तो खर्च उत्पन्नाच्या बाहेर कमिटीच्या संमतीशिवाय करण्यांत येत आहे' व त्यामुळें नोकरांचा पगार वेळेवर दिला जात नाहीं व उत्सवाची वर्गणी वेळेवर व्यवस्थापकांस रवाना करण्यांत येत नाहीं. सदर गुप्त सरक्युलरास माजी खजीनदार यांनींही लगेच गुप्त पत्रक काढून खुलासेवजा प्रत्युत्तर दिलें व तें बरेंच विचार करण्यासारखें असून त्यांत नमूद केलेल्या सुधारणा केल्याखेरीज कमिटीस दुसरा उपाय नाहीं. सदर माजी खजीनदार यांचे पत्रकानंतर दोन अडीच महिन्यांनीं मार्च १९३६ च्या अखेरीस माजी चिटणीसांनीं परत गुप्त सर्क्युलर ( rejoinder ) काढलें. परंतु तेव्हांही माजी खजीनदार यांजकडे बरीच शिल्लक आहे असें माजी चिटणीस यांच्या ध्यानीं आलें नाहीं.

मार्च अखेरीस श्रीरामनवमीच्या वेळीं कमिटीनें शके १८५६।५७च्या आढाव्याचें काम पोटकमिटीकडे सोंपविलें व पोटकमिटीनें १७।५।३६ पासून माजी खजीनदार यांजकडे आढावे तयार करण्याचा तगादा लाविला. ता. ५।६।३६ रोजीं माजी खजीनदार यांजकडून त्या वर्षांच्या कीर्दखतावणी हरवल्याचें त्यांचें पत्र येऊन ता. ७।६।३६ रोजीं आपल्याकडे बरीच शिल्लक असल्याचेंही त्यांनीं कबूल केलें. इतक्यांत ता. ९।६।३६ रोजीं माजी खजीनदार श्री. तर्खड मयत झाले.

लगेच जुलईमध्यें शके १८५८ च्या श्रीगुरुपौर्णिमेच्या वेळीं कामाचें महत्त्व लक्षांत आणून श्रीशिरडी संस्थान कमिटीनें माजी चिटणीस श्री. सुं. दि. नवलकर यांना त्यांचें चिटणीसांचें काम संभाळून शिवाय खजीनदाराचेंही काम नेमून दिलें व त्यांना माजी खजिनदारांकडील कागदपत्र

मिळविण्याचा व रोकड रक्कम वसूल करण्याचा व त्यासाठीं जरूर तो खर्च करण्याचा पूर्ण अधिकार दिला. त्यांनीं माजी खजीनदारांच्या वारसाकडून बहुतेक महत्त्वाचे कागदपत्र मिळविले. पण रक्कम वसूल करण्याचा प्रयत्न केलेला दिसत नाहीं त्यांनीं शके १८५६।५७ चे आढावे तयार केले; पण ते चुकीचे वाटल्यामुळें कमिटीनें मान्य केले नाहींत.

नंतर कमिटीनें ता. २६।१०।३६ रोजीं माजी चिटणीसांसुद्धां तीन सभासदांची नवीन पोटकमिटी शके १८५६।५७ चे आढावे तयार करण्याकरितां नेमिली होती. त्यांस माजी चिटणीसांकडून जरूर ते कागद वेळेवर मिळाले नाहींत व माहितीही पुरविली गेली नाहीं. शेवटीं रजिस्टर पत्रें पोंहचल्यावर बऱ्याच उशिरानें थोडथोडे कागद वेळोवेळीं मिळत गेले. संस्थानकमिटीपुढें हा प्रश्न माडतांच माजी सेक्रेटरी राजिनामा देऊन त्यांच्या मतें मोकळे झाले व त्यामुळें बरेच कागदपत्र उजेडांत आले. सदर पोटकमिटीनें मिळालेल्या सर्व कागदपत्रांच्या आधारें तयार केलेले सदर वर्षाचे आढावे ऑ. रजिस्टर्ड ऑडिटरकडून तपासून झाले आहेत व ते अहमदनगर कोर्टांत पाठविले आहेत. व ते दुसरीकडे या अंकांत छापले आहेत. आतां सदर रकमेच्या वसुलीबद्दल शक्य ती व्यवस्था केली जाईल.

सदर हकीकतीबद्दल कोणास कांहीं कागदपत्र पाहण्याची जरूर वाटत असल्यास हल्लींचे खजीनदार श्री. सामंत अगर चिटणीस श्री. खारकर यांजकडे अगोदर तसें कळवून केव्हांही येऊन आपली खात्री करून घ्यावी.

जून १९३६ अखेर जी संस्थानची आर्थिक हानि झाली असेल, अगर होत असेल, तिला त्या काळची संस्थानची अधिकारी मंडळी जबाबदार रहातील हें ओघानेंच ठरतें. मृत्यूमुळें या जबाबदारींतून जे निसटले, ते आपला जबाब श्रीसाईबाबांपुढें देतीलच; परंतु त्यामुळें राजीनाम्यानें अगर अन्य कारणांनीं हयात असलेल्या संस्थानच्या तत्कालीन अधिकाऱ्यांची जबाबदारी कमी होते असें नाहीं.

शेवटीं सांगणें इतकेंच कीं, हल्लींचे खज़िनदार व चिटणीस यांच्या नेमणुका नवीन आहेत. आतां कमिटीच्या सभासदांच्या लौकरच नवीन निवडणुका पण होतील. यामागील इतर कांहीं नेमलेल्या अधिकाऱ्यांनीं आपल्या कर्तव्यांत ढिलाई केली असल्यास त्यामुळें नवीन कार्यकर्त्यांबद्दल अगर त्यांच्या कामाबद्दल शंका घेण्याचें कांहीं कारण नाहीं ही गोष्ट पुढें दिलेल्या माहितीवरून दिसून येईल.

माजी चिटणीसांनीं गेल्या फेब्रुवारींत राजिनामा दिल्यानंतर संस्थान कमिटीनें खालीं नमूद केलेलीं कामें केलीं आहेत.

१ सभामंडपाच्या पूर्वेकडील सुमारें $\frac{1}{3}$ पेक्षां जास्त जागा अण्णा चिंचणकर फंडांतील हिश्यांतून पूर्वींच घेतली होती. तिच्या पूर्वेकडील श्रीद्वारकामाई पर्यंतची राहिलेली सर्व जागा रावसाहेब यशवंतराव गाळवणकर यांच्या या कामासाठीं मुद्दाम दिलेले साडेसातशें रुपयांनीं खरेदी केली आहे. त्याचप्रमाणें द्वारकामाईस लागून उत्तरेकडील जागा श्री. तात्या पाटील ( एक विश्वस्त) यांच्याकडून बक्षिस घेतली आहे. यामुळें आतां श्रीद्वारकामाईपासून समाधि-मंदिरापर्यंत (श्री. बुटीवाड्यापर्यंत) एक विस्तीर्ण क्षेत्र संस्थानच्या सर्व उत्सव वगैरे कार्यांच्या उपयोगाकरितां तयार झालें आहे. संस्थाननें आपल्या खर्चानें सदर पटांगणाला सभोंवार कंपाउंड घालून बंदोबस्त केला आहे. सदर संबंध क्षेत्रावर एक भव्य सभामंडप उभारण्याची बात्रा कोणा भक्तास सुबुद्धि देतील तो सुदिन.

२ श्रीसमर्थांची चावडी जीर्ण होऊन मोडकळीस आली होती. ती साफ पाडून तीऐवजीं चावडीची नवीन सुंदर व मजबूत इमारत त्याच जाग्या-वर बांधली आहे. तींत चावडी, वाचनालय, संस्थानचें दप्तर ठेवण्यासाठीं तसेंच चावडीचें सामान ठेवण्यासाठीं स्वतंत्र सोई केल्या आहेत व त्या खोल्यांत हवा व उजेड मुबलक घेतला आहे. सदर इमारतीचा खर्च कै. अण्णा चिंचणकर ट्रस्टमधील संस्थानच्या हिश्यांतून केला असल्यामुळें कै.

चिंचणकर यांच्या मृत्युपत्रांत दर्शविल्याप्रमाणें ' लक्ष्मी दामोदर बाबरे चिंचणकर ' यांचीं नांवें चावडीस व वाचनालयास दिलीं आहेत.

३ पूर्वीं राधाकृष्णआई राहात असलेल्या संस्थानच्या बखळ जागेंत नवीन इमारत बांधून त्यांत दुकानासाठीं सोय करून संस्थानच्या घरभाड्याचें उत्पन्न वाढविण्याचा ठराव झाला असून हें काम पावसाळा संपल्यानंतर लौकरच केलें जाईल.

४ चिटणीस व खजिनदार यांच्या नवीन नेमणुका झाल्यानंतर कायम फंडांत रु. (५००) पांचशेंचे सरकारी रोखे खरेदी करून त्याचें स्टॉक सर्टिफिकिटमध्यें रूपांतर करून तें इंपीरियल बँकेच्या स्वाधीन करून सेफकस्टडी रिसीट घेतली आहे. आणखी पांचशें रुपये अशाच रीतीनें गुंतविले गेले असते; परंतु आकस्मिक कामाकरितां ( emergency ) अगर लागल्यास कोर्टखर्चाकरितां सदर रक्कम तशीच राखून ठेवण्यांत आली आहे.

कागदपत्रांच्या अभावीं व माजी चिटणीस ( सेक्रेटरी ) यांनीं निष्कारण लोकांची दिशाभूल करून गैरसमज पसरविल्यामुळें नवीन नेमलेल्या अधिकाऱ्यांना जीं कामें करण्याची उमेद होती, ती त्यांना पुरी करतां आली नाहीं, याबद्दल दिलगिरी वाटते. परंतु विचारी, प्रेमळ व निष्ठावंत साईभक्तांच्या मदतीनें संस्थानचीं अपुरीं व आवश्यक अशीं नवीन कामें बाबांच्या कृपेनें लौकरच पुरीं होतील असा त्यांस दृढ विश्वास आहे.

—संपादक

# कमिटीनें वर्तमानपत्रांतून साईभक्तांस केलेला खुलासा

श्री साईबाबा शिर्डी संस्थानचे माजी सेक्रेटरी रा. सुंदरराव दीनानाथ नवलकर यांनीं मौज वर्तमानपत्राच्या ता. १६-६-१९३७ च्या अंकांत व इतर कांहीं वर्तमानपत्रांत जे लेख छापले, ते वाचून श्रीसाईभक्तांचा निष्कारण गैरसमज होऊं नये म्हणून खालील खुलासा करण्यांत येत आहे.

सुं.दी.नवलकर हे एक बाबांचे जुने भक्त आहेत. त्यांनीं शिर्डी संस्थानचें काम कांहीं दिवस मोठ्या आस्थेनें केलें; परंतु पुढें त्यांचें कमिटीच्या इतर सर्व लोकांबरोबर न पटल्यामुळें त्यांनीं कमिटीचें काम व जुन्या सभासदांची बाबांच्या चरणीं आस्था व सेवा लक्षांत न घेतां त्यांच्याविषयीं गैरसमज उत्पन्न करण्यांचा उपक्रम सुरू केला ही मोठी खेदाची गोष्ट आहे. संस्थानचें काम पूर्वींप्रमाणेंच आतांही सुरळीत चालत आहे व त्यासंबंधीं कोणत्याही साई-भक्तास आपली खात्री करून घेण्यास पूर्ण सवलत आहे. बाबांच्या भक्तमंडळाला बाबांच्या सामर्थ्याची पूर्ण जाणीव आहे. अशा परिस्थितींत आनागोंदी वगैरे विशेषणें देणें हें खऱ्या वस्तुस्थितीचा विपर्यास करणें आहे. तरी साईभक्तांनीं सुं. दी. नवलकर यांच्या पत्रावर मुळींच भरंवसा न ठेवतां आपली स्वतःची खात्री करून घेण्याचें करावें. तसें त्यांनीं मनांत आणल्यास संस्थान कमिटी त्यांच्याबरोबर पूर्णपणें सहकार्य करण्यास, कागदपत्र दाखविण्यास व शंका निरसन करण्यास केव्हांही तयार आहे. तरी सर्व साईभक्तांनीं बाबांच्या चरणीं पूर्ववत् निष्ठा व संस्थानविषयीं आदर, सहानुभूति व प्रेम कायम ठेऊन संस्थानची इज्जत वाढविण्यास मदत करावी व निष्कारण होणाऱ्या हल्ल्यांचा प्रतिकार करावा, अशी नम्र विनंती आहे.

**श्रीधर नारायण खारकर**

प्रशस्य सचिव श्री साईबाबा संस्थान कमिटी, शिर्डी

सोलापूर, ता. ४।४।३७

मे. मॅनेजरसाहेब, श्रीसाईलीला मासिक यांस

न. वि. वि. आपण येत्या साईमासिकामध्यें आमच्या मित्रास जे अनुभव आले, ते छापाल अशी आशा बाळगून आपणास कळवीत आहें.

माझे मित्र रा. रा. नारायण दामोदर भिडे यांचें मॅनेजरचें ऑफिस पुण्याहून सोलापूरास आलें, त्यामुळें ते येथें आल्यावर मला एक दिवस सहज म्हणाले, कीं आमचें कुटुंब गरोदर आहे व दर खेपेस बाळंतपणाच्या वेळेस मूल आडवें येऊन फार हाल होतात. त्या वेळीं मी त्यांना असें सांगितलें कीं, ह्या खेपेस आपण कांहीं काळजी करूं नका. श्रीसाईबाबांच्या कृपेनें सर्व कांहीं ठीक होईल. त्यांच्यावर भरंवसा ठेवा. त्याप्रमाणें ते रोज त्याचें चिंतन करूं लागले. त्याप्रमाणें ता. २४।१२।३६ गुरुवार रोजीं त्यांचें कुटुंब दवाखान्यामध्यें आदल्या दिवशीं जाऊन राहिलें होतें; पण वरील तारखेपर्यंत डिलिव्हरी संध्याकाळपर्यंत झाली नाहीं. हे ऑफिस-मधून घरीं आल्यानंतर उपास सोडून दवाखान्यामध्यें जाण्याचा विचार करतात, तों त्यांना थोडी गुंगी आली. तेवढ्यामध्यें त्यांस स्वप्न पडलें कीं, डिलिव्हरी रूममध्यें आम्ही बरीच मंडळी उभी आहोंत. तेथें बाबा आले. हातामध्यें लांकडाचा तुकडा होता व सर्वांना म्हणाले, 'सब चले जाव' व लांकडाचा सटका जमिनीवर आपटला, त्याबरोबर सुखरूप बाळंत झाली. त्या वेळीं एक पैशाची खडीसाखर बाबा वांटीन असें बोलून जागा झालों व लगेच हॉस्पिटलमध्यें रात्रीं ९ वाजतां गेलों तों सर्व बाबांच्या कृपेनें सुखरूप बाळंतपण झालेलें कळलें.

२ तसेंच रा. रा. पागारकर यांचा ७।८ महिन्यांचा मुलगा एक दिवस रडत होता त्याला उदी लावल्याबरोबर मुलाला सुंदर झोंप आगली. त्यामुळें ते ता. ७।३।३७ ला श्रीशिर्डी येथें जाऊन समाधीस अभिषेक करून सुवासिनी-ब्राह्मण भोजन करून मंडळीसह परत आले. आपला

**श्रीधर गणेश भांडारे**

**टीप**:—कळविण्यास वाईट वाटते कीं, सदर साईभक्त श्री. श्रीधर गणेश भांडारे हे ता. २।६।३७ रोजीं श्रीसाईचरणीं विलीन झाले. मरतांना मृत्युपत्र करून त्यांत दरसाल पंचवीस रुपये साईबाबांचे फंडांत जमा होतील अशी योजना केलेली आहे असें समजतें. श्रीसाईबाबा त्यांच्या आत्म्यास शांती देतील अशी खात्री बाळगून त्यांच्या कुटुंबाची मंडळी आपलें दुःख हलकें करून घेतील अशी आशा आहे. त्यांचे दुःखांत आम्ही भागीदार आहोंतच.

—संपादक

# कहाणीचा परिणाम

## ( सत्यकथा )

( "कल्याण" मासिकावरून. )

अनुवादकः—**रा. ब. वासुदेव अनंत बाम्बर्डेकर**

बऱ्याच वर्षांची गोष्ट. संयुक्त प्रांतांतील ' इटावा ' शहरांत सप्रू या नांवाचे गृहस्थ डेप्युटी कलेक्टर होऊन आले होते. एके दिवशीं त्यांच्या घरीं एक विचित्र घटना घडून आली. रात्रीं भोजनोत्तर दहा वाजण्याच्या सुमारें सप्रूजी पलंगावर पहुडले होते, आणि मनोहर नांवाचा न्हावी त्यांचे पाय चुरीत होता.

सप्रू:—मनोहर ! एकादी कहाणी सांग पाहूं !

मनोहर:—आपण शेंकडों पुस्तकें वाचलेले व हजारों गोष्टी ऐकलेले, अशांना मी कसची कहाणी ऐकवूं ? आपण रोज जे मुकद्दमे ऐकतां, त्या कहाण्याच होत. करितां आपणच कांहीं सांगा; मी तें ऐकेन.

सप्रू:—नाहीं; मनोहर ! तूंच एखादी कहाणी सांग.

म.:—ठीक आहे. आपली तशीच इच्छा आहे, तर सांगतों. पण मधून मधून 'हुँ'कार देत जा; नाहीं तर आपण झोंपी जाल, आणि मी बकत राहीन !

स.:—बरें आहे !

म.:—अरबस्तानांत एक बादशहा होता. गरमीचे दिवस असल्यामुळें एका रात्रीं दासीनें त्याच्या पलंगाची बिछायत महालाच्या गच्चीवर केली, आणि छतावर केवडयाचें अत्तर टाकून वातावरण सुगंधित केलें.

सप्रू:—हूँ !

मनोहर:—पलंग सोन्याचा असून बिछाने रेशमी कपडयांनीं मढविलेले होते; आजूबाजूस चार तक्के ठेवले होते, आणि सुगंधित फुलांची शेज तयार करून दासी टक लावून त्या पलंगाची शोभा पाहत राहिली होती.

स.:—हूँ !

म.:—दासीच्या मनांत विचार आला कीं, आपणाला येथें कोणी पाहत नाहीं, तेव्हां पांच मिनिटें पलंगावर पडून मंचकसुखाचा अनुभव घ्यावा. हा विचार उत्पन्न होतांच बादशाहाच्या पलंगावर ती पडली.

स.:—अच्छा ! पुढें काय ?

म.:—बिचारी दासी सारा दिवस काम करून थकली होती.वरून थंड हवा आणि खालून पुष्पांचा दारवळलेला सुगंध मिळतांच ती दोन मिनि-टांतच निद्रावश झाली !

स.:—अरे ! पुढें काय झालें ! तिची बहुतेक कम्बक्ति भरली असेल ?

म.:—एक तासानंतर भोजन करून बादशाहा-सलामत विश्रांति घेण्या-साठीं गच्चीवर उपस्थित झाले; शुद्ध पक्षांतील चंद्रप्रकाशामुळें पलंगावर दासी स्वस्थपणें झोंपली असल्याचें बादशाहाला तेव्हांच दिसून आलें.

स.:—गजब झाला !

म.:—बादशाहानें दासीला जागें करतांच ती समोर अधोमुख उभी राहून भीतीनें थरथर कांपूं लागली. आणि दोन्ही हातांनीं बादशाहाचे पाय पकडून स्फुंदस्फुंदून रडूं लागली.बादशाहा म्हणाला, ह्या कसुरीबद्दल तुला बिल्कुल माफी होणार नाहीं. शिक्षा सौम्य दिली जाईल.

सप्र:—अच्छा ! पुढें काय ?

मनोहर:—बादशाहानें आपल्या बेगमसाहेबाला बोलावून आणून तिला दासीचें कृत्य निवेदन केलें, आणि "तिनें विशेषतः तुमचाच अपराध केला असल्यामुळें तुम्हींच तिला जी शिक्षा द्यावयाची ती देण्याची व्यवस्था करावी," असें सांगितलें.

स.:—ठीक ! पुढें ?

म.:—बेगमेनें सांगितलें कीं, "दासानें साठ मिनिटांचा काल पलंगावर व्यतीत केला असल्यामुळें तिला वेताच्या काठीनें साठ फटके मारण्याची सजा मी फर्मावीत आहे."



स.:—फार सख्त सजा सांगितली तिनें !

म.:—**हातीं सत्ता आल्यावर माणूस कसाई बनत असतो** साहेब !

स.:—हाँऽऽहँ; बरें पुढें ?

म.:—बेगमेनें सांगितलेली सजा ऐकून बादशहा विचारमग्न झाला. तो म्हणाला कीं, हे फटके मारण्याचें काम जर एखाद्या पुरुषाला सांगितलें, तर दासी साफ मरून जाईल.

स.:—हूँ !

म.:—"तर मग मीच फटके लगावतें," असें म्हणून चामड्यानें मढवि-लेली वेताची काठी खुंटीवरून उचलून बेगमेनें पांच-सहा करारे फटके लगावले. बिचारी दासी रडत रडत जमिनीवर पडली, आणि बेगमही थकल्यासारखी झाली. अहो, स्त्रीची जात ती थकायचीच !

सप्र:—हूं !

मनोहर:—एक-दोन-तीन-चार अशी संख्या बादशहा मोजीत होता. तीस फटके बसेपर्यंत दासी मोठ्यानें रडत होती. परंतु पुढें तिच्या बुद्धींत अक-स्मात् बदल होऊन, पुढील तीस फटके बसत असतां ती खूब हंसत राहिली.

स.:—ती कां बरें हंसली ?

म.:—धीर धरा साहेब ! सर्व गोष्टी आपोआप खुल्या होतील.

स.:—हाँ ! बरें आहे.

म.:—सजा समाप्त झाल्यावर बादशहानें दासीला विचारलें:—"तूं प्रथम खूब रडलीस, पण पुढें हसूं लागलीस, तें कां ?" दासी म्हणाली:—मार बसत होता म्हणून मी रडत होतें; परंतु पुढें माझ्या मनांत असे विचार उत्पन्न होऊं लागले कीं, एक तास पलंगावर काढल्यामुळें जर मला ६० फट-क्यांची कठोर सजा मिळाली, तर बादशहा-सलामत, रात्रीच्या रात्री त्यावर घालवितात, त्यांची काय दशा होईल ! आणि 'बेगमसाहेबाँ' सुद्धां ह्या

सजेंतून बचणार नाहींत ! आपणां उभयतांवर वेताचे अगणित फटके पडतील ! मला सजा देणाऱ्यांना स्वतःला होणाऱ्या सजेची कल्पनाही नाहीं; मला पलंगावर निजलेली पाहतांच आपण क्रोधित झालेत, तद्वत् आपण पलंगावर पहुडलेले पाहून खुदा कुपित होत असतो. माझ्या हंसण्याचें कारण हें आहे." इतकें ऐकतांच बादशहाची बुद्धि बदलली ! त्यानें बादशाही वस्त्रालंकार सर्व फेकून दिले आणि फकिरी कफनी धारण केली. श्रीरामचंद्र प्रभु दिवसाचे अरण्यवासांत गेले, पण बादशहा अर्धरात्रीसच वनगामी झाले.

सप्रूः—वाहवा ! The duty is the beauty.

मनोहरः—आपण मला इंग्रजींत गाळी देतां कीं काय ?

स.ः—नाहीं मनोहर ? खरोखर तूं चांगली कहाणी सांगितलीस; परंतु आतां मलाही ह्या पलंगावरून उतरलें पाहिजे. 'Duty is the beauty असें पुनः म्हणून सप्रूजी खालीं उतरले आणि एक कांबळी जमिनीवर टाकून तिच्यावर झोंपले.

× × × ×

इटावा शहरांत हां हां म्हणतां खबर पसरली कीं, साडेपांचशें रुपये मासिक वेतन मिळत असलेले फर्स्ट क्लास मॅजिस्ट्रेट व डेप्युटी कलेक्टर मिस्टर सप्रू हे आपल्या अधिकारावर लाथ मारून फकीर झाले ! व बंगल्यासमोरील एका चिंचेच्या झाडाखालीं एका कांबळीवर डेप्युटी कलेक्टर फकीरी वेषांत बसले आहेत.

ही वार्ता समजतांच जिल्ह्याचे कलेक्टर, पोलिस सुपरिन्टेंडेन्ट, जिल्ह्यांतील तीन डेप्युटी कलेक्टर आणि कोतवाल इतके अधिकारी त्या जागीं उपस्थित झाले.

कलेक्टरः—सप्रूजी, तुम्हीं हें काय आरंभिलें आहे ? मागेंपुढें कलेक्टरच्या जागेवर आपली बढती व्हावी अशी शिफारस झाली असतां, आपण हा राजीनामा कां पाठविला ? तो आम्हाला स्वीकार करतां येत नाहीं.



सप्रूः—आतांपर्यंत सरकारची नोकरी केली, यापुढें माझ्या धन्याची नोकरी करणार आहें.

कलेक्टरः—फकीरी करणार काय, फकीरी ? दिवसाच्या चोवीस तासांपैकीं पांच तास सरकारी काम करा, आणि बाकीच्या वेळांत फकीरी करा. तुम्ही पण राम राम करा—आणि मी पण राम राम करीन !

सप्रूः—दुसऱ्यांना सजा देणारांना स्वतःसाठीं कोणच्या सजेची तजवीज होत आहे, ह्या विचारानें माझ्या काळजाचे तुकडे तुकडे होत आहेत.

त्यावर तेथें हजर असलेले भरथन तहसीलीचे डेप्युटी कलेक्टर म्हणाले,— "हजूर ! 'ज्ञानाची गोष्ट म्हणजे तलवारीची धारा'—म्हणजे तलवारीच्या धारेप्रमाणें आंतून ती काटीत असते. माझा मधला भाऊ बाँदा येथें तहसीलदार होता. एके दिवशीं एक काळा साप एका बेडकाला पकडून त्याच्यासमोरून निघून गेला. तें दृश्य पाहतांच त्याच्या मनांत विचार उत्पन्न झाला कीं, अशाच तऱ्हेनें एक दिवस मृत्युरूपि सर्प मला बेडकाला गट्ट करणार. त्याच वेळीं साधु बनून तो निघून गेला; त्याचा अद्यापपर्यंत पत्ता नाहीं."

कलेक्टरः—मिस्टर सप्रू ! माझ्या सांगण्यावर आपण ध्यान देत नसाल तर न द्या; पण ती पहा तुमची सुशिक्षित आणि सुस्वरूप भार्या दरवाजावर हात ठेवून रडत उभी आहे ती, आणि तो तुमचा छोटासा पुत्र रडत आहे तो. तुमच्याशिवाय तुमच्या स्त्रीचे काय हाल होतील, व तुमच्या मुलाला शिक्षण कसें मिळेल ? मुलाला शिक्षणसंपन्न करून मग फकीर व्हा, मग मीही फकीर होईन.

सप्रूः—नाहीं साहेब ! भूखी-प्यासी अशा गरीब रयतेचा पैसा वेतनरूपानें घेऊन मीं जी पलंगबाजी केली आहे, त्याबद्दलची सजा मला जरूर भोगावी लागेल. आतां यापुढें मी दुसऱ्याचा इन्साफ करणार नाहीं; खुद स्वतःचा इन्साफ करणार आहें. जो स्वतःचा इन्साफ करीत नाहीं, तो दुसऱ्यांचा काय करणार ?

सप्रूंची समजूत घालून त्यांना निवृत्तिमार्गापासून परावृत्त करण्याचा सर्वांनीं प्रयत्न केला, पण व्यर्थ. शेवटीं निराश होऊन कलेक्टरनें त्यांचा राजीनामा घेतला. मनोहर न्हावी छाती पीट-पिटून श्रीमती सप्रूंच्या पायीं पडला आणि म्हणाला कीं, कहाणी सांगण्याचा असा परिणाम होईल हें माहीत असतें, तर ती कहाणी मीं सांगितली नसती ! ''

× × × ×

इटावा शहरापासून दक्षिणेस एक मैलावर यमुना नदी आहे. तिच्या एका पक्क्या घाटावर भूतपूर्व डेप्युटी कलेक्टर सप्रूजी हे फाटकी कांबळी आणि एक मोठा सोटा घेऊन बसलेले असत. यमुनेच्या पात्रांत उभे राहून व हातांतील सोटा खटखटावीत ते केव्हां केव्हां म्हणत **'लगा रह खटका !' 'खटकेका खटका–खटपट करता रह ! !' 'मत मिटना–खटखटा !!! '**

बरोबर दहा वाजतां झोळी घेऊन सप्रूजी भिक्षेसाठीं शहरांत जात असत. सर्व लोक त्यांना ओळखीत असल्यामुळें त्यांनीं आपल्या दारावर यावें अशी प्रत्येक घरवाला इच्छा करीत असे. सप्रूंचें भिक्षान्न म्हणजे फक्त गव्हांच्या रोटया ( भाकरी ) असत. रोटया झोळींत घेऊन, झोळीसहित त्या यमुना-जलांत बुडवून, झोळी चिंचेच्या झाडावर लोंबकळत ठेवीत असत. चार वाजल्यावर त्यांतील थोडासा भाग खाऊन शेष भाग तेथील वानरांना वांटून देत असत. एक फाटकी कांबळी आणि झोळी यांशिवाय दुसरें कोणचेंही वस्त्र ते जवळ ठेवीत नसत. अशा प्रकारें इटावा शहरांत डेप्युटी कलेक्टरच्या हुद्यावर काम केलेल्या सप्रूंनीं त्याच शहरांत बारा वर्षेपर्यंत घोर तपस्या केली.

× × × ×

खट-खट असा सोटयाचा आवाज करीत असल्यामुळें, लोक त्यांना **'खटखटा बाबा'** म्हणूं लागले. इटाव्यांत त्यांच्याविषयीं दोन गोष्टी सर्वविश्रुत आहेत. ( १ ) एकदा खटखटाबाबानें भंडारा केला. तुपाची कढई चुलीवर चढवून पुऱ्या तळून काढल्या जात होत्या. भंडाऱ्यासाठीं

आणविलेलें तूप संपून गेलें. शहर बरेंच दूर असल्यामुळें बाबांनीं दोन कळसेभर यमुनाजल आणून कढाईंत सोडण्यासाठीं एका शिष्याला सांगितलें. शिष्यानें त्याप्रमाणें केलें व यमुनाजलाचें तूप बनून त्यांतून पुऱ्या तळल्या गेल्या ! ( २ ) एकदा कोणी एक सिद्धपुरुष यमुना प्रवाहाच्या मध्यभागीं पद्मासन घालून बसलेले प्रवाहाबरोबर चालले होते. खटखटा बाबा पैलतीरावर उभे होते; त्यांना पाहून " मला पाणी पाजून जा " असें ते म्हणाले. बाबाजींनीं पाण्यानें भरलेला लोटा हातांत घेऊन यमुनेच्या जलप्रवाहावरून चालत जाऊन त्या महात्म्याला पाणी दिलें, व तसेच परत आले.

× × × ×

इटाव्यामध्यें खटखटाबाबांचें भव्य समाधिमंदिर बांधलें असून, आतां त्या ठिकाणीं अनेक इमारती बांधल्या गेल्या आहेत. हें समाधि-मंदिर इटाव्याचें तीर्थस्थान झालेलें आहे. इटावा जिल्ह्यांतील प्रत्येक लहान-थोर मनुष्याला बाबांचें नांव सुपरिचित झालें आहे. मंदिराजवळ बांधलेली विद्यापीठाची इमारत दर्शनीय आहे. त्यांत हजारों प्राचीन ग्रंथांचा अपूर्व संग्रह केलेला आहे. प्रतिवर्षी एकदां त्या ठिकाणीं मोठा मेळा भरत असतो. त्यासाठीं भारतांतील अनेक ठिकाणचे विद्वान्, तपस्वी, योगी, आणि पंडित अशा थोर पुरुषांना आमंत्रणें देऊन बोलाविण्यांत येत असतें. धार्मिक चर्चा, प्रवचनें आणि व्याख्यानें खूप होत असतात. खटखटाबाबांचें पूर्ण जीवनचरित्र लिहून देण्यासाठीं समाधिस्थानाच्या वर्तमान व्यवस्थापकांकडे अनेक वेळां विनंती करण्यांत आली; परंतु " आपलें चरित्र प्रसिद्ध होऊं नये अशी बाबाजींची इच्छा होती " असें उत्तर मिळालें.

---

श्रीसाईमहाराज प्रसन्न

# श्रीसाईनाथ कथा-करंडक

( लेखक:—**समर्थांचा चोपदार** )

## कथा ३ री

मी पाथरी परभणीहून एकदां निघालों, तो थेट मच्छलीपट्टणचा रस्ता धरला. जातां जातां एका गांवांत भाकर मागावयास गेलों, तें घर एका ब्राह्मणाचें होतें. मीं भाकर मागितली तों तो घरधनी बाहेरगांवांत येऊन म्हणाला, " नीच फकिरड्या, ही वेळ भाकर मागण्याची आहे का ? चालले उठल्यासुटल्या भाकर मागायला. भाकर फुकटची होते का ? दाणे मिळवावे लागतात, ते दळावे लागतात, पीठ मळावें लागतें, त्याची भाकर करावी लागते, मग ती भाजावी लागते, त्याला सरपण लागतें." इतकें तो बोलत आहे तों त्याची बायको आंत होती, तिनें चटकन एक चतकोर भाकर आणून माझ्या पदरांत टाकिली. मी ती घेऊन निघतांना " अल्ला भला करेगा " असें म्हणालों, हें पाहून घरधनी फारच संतापला, आणि त्यानें मला आणि आपल्या घरवालीला शिव्यांचा भडिमार सुरू केला. मी म्हटलें, "महाराज, ही आपली भाकरी परत घ्या, आणि शांत व्हा कसे !" याला तो घरधनी म्हणाला, " त्याला तूं शिवलास, आतां आमच्या ती काय उपयोगी ? आम्ही मुसलमान आहों का ? " मीं म्हटलें, "मुसलमानाचा पैसा चालेल ना ? " असें म्हणून एक मोहोर हातांत पडतांच बामणबोवा पाघळले. आणि आपल्या घरवालीला म्हणाले, "रांडे, एक चाकोर घातलास, ते दोन घातले असतेस तर हात झिजले असते का ? आतां तरी कांहीं कोरड्यास असलें तर घाल." बिचाऱ्या त्या ब्राह्मणाला मी म्हटलें, "महाराज, मला इतकेंच पुरे; आणि मला कोरड्यासाचीही जरूरी नाहीं, मी नुसताच कुटका खातों." असें म्हणून मी चालता झालों. मी पाठमोरा होतों तोंच तो ब्राह्मण आपल्या घरवालीबरोबर हमरेतुमरेवर



आला. बायको म्हणाली, "फकिरानें दिलेली मोहोर पूजेंत ठेवा." नवरा म्हणे, " मला खर्चाला पाहिजे." असें होतां होतां मारामारीवर येऊन दायकोस दोन चपराकी तर बसल्याच ! मी अजून लांब गेलों नव्हतों; चपराकीचा आवाज कानीं पडतांच मी मागें वळलों, आणि त्या दोघांची समजूत घातली कीं "निदान आजचा दिवस तरी त्या मोहोरेची पूजा होऊं द्या. तुम्हांस खर्चावयास पाहिजे असल्यास मी आणखी देतों;" असें म्हणून मीं आणखी दोन मोहरा काढून त्या घरवालीच्या हातांत दिल्या आणि तिला सांगितलें, " आई, ती मवाशीं दिलेली मोहोर तुझ्या इच्छेप्रमाणें देवांत पूजीत जा आणि ह्या आतां दिलेल्या मोहोरा ह्या बावाच्या हातांत दे, म्हणजे त्याला खर्चायला उपयोगीं पडतील." ह्याप्रमाणें तंटा मिटवून मी चालता झालों, तो गांवाच्या बाहेर तडक निघून गेलों. पुढें असें झालें कीं, त्या ब्राह्मणानें एक मुसलमानीण ठेविली होती. तिला ही गोष्ट कळली. तिनें लागलीच एक इसम ह्या ब्राह्मणाकडे पाठवून, त्याच्याकडून त्या मोहरा हिरावून घेतल्या. तिचा तनखा बराच राहिला होता, म्हणून त्या ब्राह्मणानेंही विशेष आढेओढे न घेतां त्या दोन्ही मोहरा निमूटपणें त्या आलेल्या इसमाबरोबर पाठवून दिल्या, आणि हा सर्व व्यवहार आपल्या बायकोच्या देखत झाल्यामुळें, त्या रात्रीं स्वारी बाहेर न जातां घरांतच विश्रांति घेण्याकरितां राहिली. त्या रात्रीं त्या ब्राह्मणाच्या स्त्रीला स्वप्न पडलें, त्यांत एका ब्राह्मणानें येऊन तिला सांगितलें कीं, तूं पतिव्रता आहेस यांत संशय नाहीं. पण तुझें पातिव्रत्य पूर्ण उदयास येण्यास उद्यांपासून तुझा पति जें कांहीं म्हणेल तें त्याला खुशाल करूं देत जा ! त्याच्या इच्छेआड मुळींच जाऊं नकोस, अगर मनांतही विरुद्ध वागण्याची गोष्ट आणूं नकोस; तुझें कल्याणच होईल. पुरुषांस साठ साठ हजार वर्षें तप करून जें पुण्य प्राप्त होतें, त्याच्या किती तरी पट बायकांना एका पतीवर निष्ठा ठेवल्यानें सहज प्राप्त करून घेतां येतें ! पहा, विश्वामित्राचीं साठ हजार वर्षें एका स्त्रीनें एका झटक्यासरशीं लोळवून टाकिलीं ! आणि

सावित्रीनें आपल्या पतीवरील निष्ठेच्या जोरावर त्रिरात्र तपानें प्रत्यक्ष यमाला-सुद्धां थक्क करून सोडलें! तेव्हां तूंही सांगितल्याप्रमाणें वागत जा. प्रात:काळीं बाई नेहमींप्रमाणें उठून आपल्या कामास गेली. नवऱ्याला दोन मोहरा जशा मिळाल्या होत्या, तशा नाहींशा झाल्यामुळें, व उद्यां रात्रीं आपल्या प्रियपात्राकडे गेल्यावर, आणखी काय बखेडा उत्पन्न होतो या धास्तीनें बिलकुल झोंप आली नाहीं. रात्रभर तसाच तो तळमळत पडला.

प्रातर्विधि आटपून तो देवपूजेस गेला, तों देव्हाऱ्यांत मोहोर नाहीं असें पाहून बायकोला मोहोर कोठें आहे म्हणून विचारतां 'माझ्याजवळ आहे व तुळशीच्या पूजेबरोबर मीं तिची पूजाही केली आहे,' असें ती म्हणाली. हें ऐकून त्या ब्राह्मणानें नेहमीप्रमाणें देवाची पूजा करून, भोजन उरकून, तो आपल्या शेताकडे चालता झाला. नित्याप्रमाणें संध्याकाळीं तो परत घरीं आला. आणि फराळ करून स्वारी रोजच्या क्रमाप्रमाणें आपल्या प्रियपात्राकडे चालती झाली. प्रियपात्राची गांठ पडल्याबरोबर तिनें तिसरी मोहोर आणली का म्हणून विचारलें; ब्राह्मण म्हणाला, "ती आमच्या बायकोनें घरांत पुजून ठेविली आहे. ती मला आणतां येणार नाहीं." प्रिय-पात्र म्हणालें, "तूं अजून इतका बेवकूब आहेस हें मला माहीत नव्हतें. मूर्खा! मोहोर कोणी पूजीत असतात काय! अगोदर तूं त्या फकिराला जाऊं कसा दिलास? त्याला आपल्या घरांत कां ठेवून घेतला नाहींस? अगर मला कां कळविलें नाहींस? मीं त्याला ठेवून घेतलें असतें. रोज तीन मोहरा देणारा फकीर तूं खुशाल जाऊं दिलास, या तुझ्या मूर्खपणाला काय म्हणावें? माझ्या बाराव्या का तेराव्या नवऱ्याला असाच एक फकीर दर-रोज वाटेल तितके पैसे देत असे! पण तो दारूबाज असल्यामुळें एक पैसाही माझ्या हाताला लागूं देत नसे. ह्यामुळें मीं त्याला कंटाळून सोडून दिलें, आणि तुला ठेवला. तों तूं ही सोन्यासारखी संधि प्राप्त झाली असतां ती मूर्खपणानें घालविलीस! तेव्हां तुझ्यापेक्षां माझेंच दुर्दैव म्हणावयाचें, दुसरें काय? आतां ती पूजेंत ठेवलेली मोहोर जर उद्यां घेऊन आलास, तर

दार उघडीन ! नाहीं तर तुला हीच अखेरची सलामी म्हणून समज." असें बोलून तें प्रियपात्र एका कोंपऱ्यांत निजलें. ब्राह्मण मांडया खाजवीत एकीकडे पडला ! दुसरे दिवशीं ब्राह्मण घरीं जाऊं लागला. त्या वेळीं त्याच्या त्या प्रिय पात्रानें त्याला बजावलें कीं, "तूं जातो आहेस; पण जर ती तिसरी मोहोर जेवावयाच्या अगोदर मला आणून दिली नाहींस, तर तुला ह्या घरांत मीं पाऊल ठेवूं देणार नाहीं हें पक्कें समजून राहा." ब्राह्मण गोंधळून गेला; परंतु तो निराश झाला नाहीं; त्याला वाटलें आपली बायको, आपण आग्रहच धरला, तर मोहोर देण्याचें कबूल करील. तेव्हां घरीं जाऊन प्रथम तिच्याशीं हीच गोष्ट काढली पाहिजे. मोहोर मिळालीच, तर ताबडतोब ती प्रियपात्रास नेऊन द्यावी, मग दुसऱ्या कामास लागावें. आणि तसा विचार करीत तो घरीं येऊन पोहोंचला. इकडे ब्राह्मणाच्या बायकोनें सडासंमार्जन सारून तुळशीची व मोहोरेची पूजा करून, स्वयंपाकास सुरवात केली होती. तिला ब्राह्मणानें विचारलें "का, पूजा वगैरे झाली का ?" बायको म्हणाली "होय; माझें सर्व झालें आहे. आपलीच वाट पाहत आहें. स्नान करावयाचें असेल, तर पाणी काढतें." ब्राह्मण म्हणाला, "तें सध्या असो; पण आजही त्या मोहोरेची पूजा केलीस कीं काय ? रोज रोज कशाला मोहोर पुजावयास पाहिजे कोण जाणें ? तें का दैवत आहे ! पण तुझें आपलें जें डोक्यांत येईल तेंच करायचें ! आण ती इकडे मोहोर ! मला एकाचें देणें राहिलें आहे, तें देऊन टाकतों." नवऱ्यास कोणत्या रीतीनें अडवावयाचें नाहीं, असा बायकोनें निश्चय केला होता म्हणून ती कांहीं आढेवेढे न घेतां ती म्हणाली, "मोहोर आतांच देऊं का ? किंवा आंघोळ करून आपणच घ्याल ?" ब्राह्मणाला आंघोळ करून आपणच मोहोर घ्यावी आणि तशीच ती आपल्या प्रिय पात्राला देऊन मग भोजन करावें, हें पसंत पडलें. आणि तो आंघोळीस गेला. आंघोळ करून पुढच्या ओसरीवर धोतर नेसण्यास आला. तोंच एक वृद्ध पांथस्थ घरांत शिरला, व "घटकाभर राहण्यास जागा मिळेल काय ?"

म्हणून विचारूं लागला. ब्राह्मणाला आदल्या दिवशींच्या फकिराची आठवण झाली. मग थोडें उदार मन करून त्यानें त्या पांथस्थाला " खुशाल राहा " म्हणून सांगितलें. " जरूर तर आमच्या इथेंच भोजनही करा. " असें तो म्हणाला. पांथस्थ म्हणाला, "मी संध्याकाळीं जेवीत असतों; माझें थोडें देव- देवतार्चन आहे, तेवढें सारून ऊन जरा खालीं झालें, म्हणजे मी पुढच्या मार्गास लागणार; तेव्हां आपण खुशाल उरकून घ्या. माझी काळजी नको. इतक्यांत कोणाशीं बोलणें चाललें आहे, हें पाहण्याकरितां बाई बाहेर आली. आपल्या स्वप्नांत जो ब्राह्मण आला होता, तो हाच पांथस्थ होय असें पाहून तिनें त्या पांथस्थाला नमस्कार केला. आणि भोजनाबद्दल आग्रहही केला. परंतु त्यानें तिच्या नवऱ्याला जें सांगितलें होतें, तेंच बाईलाही सांगितल्यामुळें तिनें त्या पांथस्थाला स्नानास पाणी वगैरे देऊन आपल्या नवऱ्याबरोबर त्या पांथस्थालाही पूजा करण्यास सांगितलें. नवऱ्याचें चित्त सगळें मोहोरेवर होतें. पांथस्थ देवघरांत येण्यापूर्वीच मोहोर काढून पोटकुळीस लावावी असा विचार करून तो ती मोहोर उचलून घ्यावयास लागला, तों ती तुळशीच्या पाटास चिकटली आहे, असें त्याला आढळून आलें. ती जेव्हां कांहीं केल्या निघेना, तेव्हां त्यानें बायकोस हाक मारून ती मोहर काढून देण्यास सांगितलें. तिनेंही पुष्कळ खटपट केली, पण तिलाही ती निघेना. मग बायको तुळशीवृंदावन उचलूं लागली, तों तेंही पाटाला चिकटून राहिलें; तें कांहीं केल्या पाटापासून वेगळें होईना. नवरा-बायको ह्या खटपटींत आहेत, तोंच तो पांथस्थ देवघरांत शिरला; आणि मग ती घरवालीही स्वयंपाकघरांत गेली. पांथस्थानें कांहीं विचारपूस केली नाहीं; परंतु घरवाल्याच्यानें राहवेना. त्यानें पुन्हा ती मोहोर काढून घेण्याची खटपट चालविली. तें पाहून पांथस्थ म्हणाला, " काय करतां ? आयती पाटाला चिकटली आहे ती वेगळी कां काढतां आहां ? पूजा करण्यास अशीच ठीक आहे. पाटावेगळी असती, तर खर्चून गेली असती. " घरवाला म्हणाला, "खर्चण्याकरितांच ती मीं वेगळी काढीत आहें;

परंतु ती कांहीं केल्या निघत नाहीं; काय करावें ? " पांथस्थ म्हणाला, " तुम्हांला खर्चावयास पाहिजे असल्यास मी ४–५ रुपये देतों. मोहोर आहे तशीच ती राहूं द्या. प्रासादिक देणगी आहे, घरांतच असूंद्या," असें म्हणून कनवटींतून पांच रुपये काढून त्यानें घरवाल्याच्या स्वाधीन केले. घरवाला चकित झाला ! पण वास्तविक त्या लोभिष्टाला मोहोर पाहिजे असल्याकारणानें त्यानें थोडें धारिष्ट करून पांथस्थापाशीं मोहोर मागितली. पांथस्थ म्हणाला, " माझी देवपूजा झाल्यावर मी तुम्हांला विचार सांगतों; त्याप्रमाणें त्या पाटास चिकटलेल्या मोहोरेची तुम्हीं पूजा केली पाहिजे; तुम्हांला दुसरी मोहोर प्रसाद म्हणून मिळत जाईल. आणि मग तुम्हांला कांहीं कमी पडणार नाहीं. जरा माझी पूजा होईपर्यंत दम धरा. घरवाल्यास चुंबित बसावें लागलें. पांथस्थाची पूजा सपल्यावर त्यानें घरवाला व त्याची बायको यांच्याकडून पाटावरच्या मोहोरेची पूजा करवून एक मोहोर उत्पन्न करून दाखविली, आणि त्या पूजेचा विधि घरवाल्याला सांगून ऊन खालीं झाल्यावर तो आपल्या मार्गास लागला. इकडे असें झालें कीं, प्रियपात्राची वेळ टळल्यामुळें त्या ब्राह्मणाचा संबंध अनायासें सुटला; अशी अल्लामियाची करणी आहे ! !

---

## श्रीसाईसच्चरित

# अध्यात्मिक निरीक्षण

( लें.—सुमनसुंदर )

## अध्याय ३ रा

" मन एव मनुष्याणां कारणं बन्धमोक्षयोः ॥ "—अमृतबिंदु २

गताध्यायीं श्रीबुद्धिदेवीच्या कृपेनें आपणांस विचार व विवेक प्राप्त झाले; हीं **साध्य** जो परमात्मा तो मिळविण्याचीं म्हणजेच मोक्षाचीं **साधनें** होत. आतां **साधक** कोण ? जीवात्मा ? नाहीं ! जीवात्मा हा परमात्म्याचा—ज्ञानाचा, चैतन्याचा अंशच असल्यामुळें त्याच्यापाशीं साधक, साधन व साध्य इत्यादि त्रिपुटी नसते. तो नित्य मुक्तच असतो; मग तो बंधनांत असलेला भासतो तो कशामुळें ? तर मनामुळें ! ह्या मनांत ज्या भावना उत्पन्न होतात, त्यांमुळेंच जीवात्मा बंधनांत पडलेला भासतो. तेव्हां **मन** हेंच **साधक** ठरतें. " मन एव मनुष्याणां कारणं बंधमोक्षयोः " " संकल्प विकल्पात्मकं मनः । " अशी त्याची सामान्यतः व्याख्या करतात. ( गीतारहस्य ६. ) संकल्पानुसार मन कार्य घडवितें; तो सुसंकल्प असला व तो सिद्ध झाला कीं परमात्मा भेटतो—मोक्ष मिळतो ! " भावना म्हणजे संकल्प, त्या भावनेचे प्रकार दोन—एक सिद्ध भावना व दुसरी असिद्ध भावना. ज्या भावनेंत तिच्या विरुद्ध विकल्पांचा मुळींच प्रवेश होत नाहीं—मन आपल्या ध्येयावरून मुळींच प्रचलित होत नाहीं—तिला सिद्ध भावना म्हणतात....विकल्प मनांत प्रवेश करीत असल्यामुळें आपली भावना असिद्ध राहते....याकरितां जसजशा अनुभवांची अपेक्षा असेल, तसतसा संकल्प करावा. मग तो संकल्प करतां करतां "मी संकल्प करीत आहें

या भावाचें पूर्णपणें विस्मरण होईल, तेव्हां तो संकल्प सिद्ध होईल !..मग हवें तें महत्कार्य सिद्धीस जाईल !" (श्रीदत्तभार्गवसंवाद प्र. १४)

आपण 'मुमुक्षु' आहोंत, तेव्हां आपण सुसंकल्पच करणार ! पण तसेंच आपण जन्मत: मायाधीन आहोंत. ती चेटकी आपल्याला आपला मोक्ष-मार्ग सिधा थोडाच गांठूं देणार ? ती नाना विघ्नें आणणारच ! संकल्पाला विघ्न कोठलें ? तर विकल्प ! ह्यालाच दुर्बुद्धि म्हणतात. तेव्हां आपला संकल्प जर सिद्ध होण्याचा असेल,तर विकल्प नाहींसा झाला पाहिजे ! तो कसा होतो ? हेंच आतां आपणांस पहाणें आहे !

" शिरडीस आला एक रोहिला । प्रेमें वाहिला बाबासी —३-१०९

**कथासार ( १०९ ते १४१ )**

" एक धष्टपुष्ट उन्मत्त रोहिला शिरडीला आला व वेळीं-अवेळीं मोठ-मोठयानें कलमें पढूं लागला. त्यामुळें शेजाऱ्यांना उपद्रव होऊं लागला.त्यांनीं बाबांच्या कानीं ही गोष्ट घातली; पण बाबा लोकांवरच उलटले व म्हणाले, " तो ओरडतो आहे म्हणून मला स्वस्थता आहे. तो थांबला कीं त्याची बायको–रांड दुर्बुद्धि-माझ्याशीं लगट करूं पाहते, तो कंटाळला कीं आपोआप स्वस्थ बसेल; मलाही ती रांड छळणार नाहीं व तुमचाही त्रास चुकेल." इ.

**निरीक्षण**

ह्या कथेंत शिरडी म्हणजे परब्रह्म, बाबा जीवात्मा, रोहिला-संकल्पयुक्त मन, रोहिली-विकल्पयुक्त मन-दुर्बुद्धि, व शिरडींतील जन-इंद्रियें; असें रूपक आहे.

रोहिला शिरडीस आला. मनाला मोक्षाची जिज्ञासा झाली ती कशानें ? तर बाबांचे गुणास मोहिला म्हणून ! जीवत्म्याच्या प्रेरणेनें परमात्म्याचा अंश जो जीवात्मा तो मुळांत शुद्ध, मुक्तस्वभाव, निर्गुण व अकर्ता असला, तरी देह व बुद्धयादि इंद्रियें यांच्या कोंडींत सांपडला असल्यामुळें तो मनांत जें स्फुरण उत्पन्न करतो, त्याचें प्रत्यक्ष अनुभवरूपि ज्ञान आपणास होऊं

शकतें. अनादि पूर्वकर्मार्जित जड देह व इंद्रियें यांनीं परमात्म्याचा अंशभूत जीव कोंडला गेला म्हणजे या कोंडींतून त्याची सुटका करून देणारीं (किंवा मोक्षानुकूल ) कर्मे करण्यास देहेंद्रियांची प्रवृत्ति होऊं लागते; व यालाच व्यावहारिक दृष्ट्या **" आत्म्याची स्वतंत्र प्रवृत्ति "** असें म्हणतात.

आत्मा कोंडीच्या उपाधींत सांपडल्यामुळें तद्द्वारा इंद्रियांना मिळणारी ही स्वतंत्र प्रेरणा, व बाह्य सृष्टींतील पदार्थांच्या संयोगानें इंद्रियांच्या ठायीं उत्पन्न होणारी प्रेरणा या दोन्हीं अगदीं भिन्न आहेत. खा, पी, चैन कर, या इंद्रियांच्या प्रेरणा होत; व आत्म्याची प्रेरणा मोक्षानुकूल कर्में करण्यास सांगत असते. पहिली प्रेरणा नुसत्या बाह्य म्हणजे कर्मसृष्टींतील आहे व दुसरी आत्म्याची म्हणजे ब्रह्मसृष्टींतील आहे......भक्तीसाठीं जेव्हां द्वैताचा स्वीकार करण्यांत येतो, तेव्हां जीवात्म्याचें हें सामर्थ्य, त्याच्या स्वतःचें नसून त्याला परमेश्वराकडून प्राप्त होत असतें असें सांगण्यांत येतें. "

( गीतारहस्य प्र० १० )

म्हणजे जीवात्मा मनाला नित्य टोंचणी देत असतो, व ती मनाला कळली कीं मन त्याच्याकडे वळतें; " तोही बाबांचे गुणास मोहिला।" ३-१०९ व एकदां का त्या जीवात्म्याची ओळख पटली-"प्रेमें वाहिला बाबासीं"।३-१०९ कीं तें उन्मत्त होतें—"स्वैर वर्ती न जुमानी कोणाला।" ३-११०. तें फक्त जीवात्म्याला ओळखतें व त्याचीच सदैव सेवा करण्यास तत्पर असतें. त्याला इंद्रियजन्य विषयांची चाड राहत नाहीं. अर्थात् तें विषयपराङ्मुख बनतें; विषय हेच गांवींचे लोक ! विषयांची हेळसांड झाली, कीं ते ओरडूं लागतात व जीवात्म्याशीं दाद मागतात : " गांवींची सर्व मंडळी। काकुळती आली बाबांसीं॥" ३-११८. पण जीवात्मा त्यांना दाद देत नाहीं: कां ? तर त्यानेंच स्वतःच्या सुटकेसाठीं मनाला चेतविलेलें असतें; "परी बाबा न लक्ष देती। ग्रामस्थासींच उलट वदती॥ " ३-११९; तो लाघवी भाषण करतो:—

" बावांनो, मनावर माझा फार लोभ आहे. 'तो मज अति प्रिय वाटे' ३-११९ ( कां ? तर स्वतःची सुटका तोच करतो म्हणून ) त्याची बाईल जी दुर्बुद्धि, ती महा कुटाळ आहे. तिनें आपली 'लाजलज्जा लाविली वेशीं' ३-१२१ ( 'मन चिंतीं तें वैरी न चिंती । ' विकल्पानेंच आपण स्वत्त्वाला मुकलों आहोंत ! विकल्प केव्हां उद्भवतात ? तर मन स्वस्थ असेल तेव्हांच ! ती रांड त्याला सोडून मला चिकटू पहाते:–

> " न क्रिया नच कर्तृत्वं कस्यचित् सृज्यते मया ।
> न क्रिया बीजसंपर्कः शक्त्यातत्क्रियतेऽखिलम् ॥
> कस्यचित्पुण्यपापानि न स्पृशामि विभुर्नृप ।
> ज्ञानमूढा विमुह्यन्ते मोहेनावृत्त बुद्धयः ॥" ४-१३-१४
>
> –ग. गीता.

मी जीवात्मा वस्तुतः मुक्त असतां विकल्प मलाच चिकटविल्यामुळें मी बंधनांत भासतों; मी विकल्प चिकटवूं न घेण्याची सदैव खटपट करतों; पण " हाकून बाहेर घालतां तिजसी । बलात्कारेंसी घरघुरे ॥ " ३-१२१ त्यांचा माझ्यावर अध्यारोप केला जातो. तेव्हां हें लचांड टाळावयास मी जीवात्मा काय करतों, तर तिचा जो नवरा-संकल्पयुक्त मन रोहिला-त्यालाच माझ्या शेजारीं बसवतों; मन संकल्पयुक्त होऊन मोक्षाच्या मार्गाला लागलें, कीं विकल्प पळ काढतो. ' तो ओरडतां ती पळे त्रिशुद्धि । सुख समृद्धि मज तेणें ॥ ' ३–१२२. असें ओरडतां ओरडतां मन तन्मय झालें, कीं ध्याता, ध्यान व ध्येय ही त्रिपुटी नष्ट होऊन विकल्प आधिभौतिक, आधि-दैविक व आध्यात्मिक असा त्रिशुद्धि पळ काढतो. पण 'ओरडूं थांबते तेच संधी । शिरूं पाहे रांड दुर्बुद्धि ॥ ' ३–१२२. मन निरुद्योगी ठेवलें, कीं नाना विकल्प उद्भवतात व एकाग्रता चळते; म्हणून ' ऐसा हा रोहिला परोपकारी । बहु सुखकारी मजलागीं ॥' ३–१२४. मी जीवात्मा या मता-मुळेंच मुक्त होतो. करितां ' जावें न कोणी त्याच्या वाटे । ओरडूं द्या मुक्तकंठें ॥ ' ३–१२३. मनाला केव्हांही मोक्षानुकूल आचरण करण्यास

परावृत्त करूं नका, तर नेहमीं प्रवृत्त करा; कारण 'तयावीण मज रात्र न कंठे । सौख्य मोठें तेणेनीं ॥' ३—१२३. ही रात्र-माया-मला जीवात्म्याला दुस्तर आहे. पण मनाच्याच सांगातीनें मी भवपार होतों व आत्मसौख्य लाधतों.

जोंपर्यंत मी जीवात्मा साध्य आहें व मन साधक आहे, तोंपर्यंतच साधनाचीं कलमें पढण्याची जरूरी आहे. म्हणून ' ओरडूं द्या त्यास यथेष्ट' त्यांतचि आहे माझें इष्ट ।' ३-१२५. म्हणून साधकानें नेहमीं साधन करीत असावें ! 'नातरी ती रोहिली दुष्ट । देईल कष्ट मजलागीं ।' ३-१२५. विकल्पा-मुळें मी जीवात्मा मुक्त होणार नाहीं. एकदा का स्वस्वरूपज्ञान झालें, कीं ही त्रिपुटी नाश पावेल. 'स्वयेंच जैं मग थकेल । आपोआप स्वस्थ राहील ।' ३-१२६. कारण 'आतां भजूं कवणेपरी । देव सबाह्य अंतरीं ।' अशी स्थिति येईल व मनाला मनाचा मूर्खपणा कळेल कीं, " आपण मन म्हणजे दुसरें कोणी नसून आत्माच आहोंत. आत्मा निश्चल आहे. मी मनही वस्तुतः निश्चल अतएव आत्माच आहें. पण विकल्परूपि दुर्बुद्धीच्या संगतीनें मी चंचल झालों व स्वरूपज्ञानाला मुकलों व मी मन व आत्मा अशीं दोन भिन्न आहोंत हें द्वैत स्वीकारून लटक्याच बंधनांत पडलों. " 'बंध हा खरोखरीचा आहे हें एक आणि मन म्हणून एक पदार्थ आहे हें दुसरें. या जोडीशिवाय कोणताच कोणाला कोठें बंध नाहीं.' (श्री.द. भा. सं. प्र. १८) हें आतां कलमें पढतां पढतां माझ्या प्रत्ययास आलें. ती दुर्बुद्धीची उपाधि टळली. विकल्प गेला, आतां माझा मींच सर्वत्र व मुक्त आहें. 'समोऽहं सर्वभूतेषु' । मग ध्याऊं कसा आणि कोणाला ? अर्थात् अशी अवस्था मनाची-रोहिल्याची झाली, कीं निर्विकल्पच होऊन तो जीवन्मुक्त होईल आणि मला—

लोकानां संग्रहायैतद् विद्वान्कुर्यादसक्तधीः ॥ २-२५. ग. गीता. या न्यायानें तो आपलें प्रारब्धप्रणित कर्म अनासक्त भोगील. त्यामुळें विषयांची

ओढाताण होणार नाहीं. साधकावस्थेंत जो त्यानें विषयांचा त्याग केला, तो आतां त्याला करावा लागणार नाहीं. म्हणजे 'कार्यभाग तुमचा साधलेला'। व 'मजही न बाजेल ती रांड ॥' ३-१२६. 'मी जीवात्मा मुक्त होईन !'

या कथेंत साधकानें मोक्ष मिळविण्यासाठीं कसें वागावें याचें विवरण बाबांनीं फारच सुंदर केलें आहे. साधकाच्या मनाला विषयांचें मिथ्यत्व पटलेलें असतें, पण तो विषयकर्दमांत इतका गढून गेलेला असतो कीं, दिङ्मूढ बनून नुसतें डोकें खाजवून विचार करण्यापलीकडे प्रत्यक्ष असें तो कांहींच करीत नाहीं. नुसता विचार करून कांहीं निष्पन्न होत नाहीं. उलट मनाची शांतता मात्र ढळते, नाना विकार येतात, डोकें जास्त भ्रमण करतें व त्याचा परिणाम अखेर कांहीं न करण्यांत वा विकारवश होऊन कांहीं विपरीत करण्यांतच होतो. म्हणून विचाराला आचाराची जोड नित्य दिली पाहिजे. 'करील त्याचेंच सर्व आहे' विचारपूर्वक एक ध्येय ठरवून तें गांठण्याचा कांहीं तरी मार्ग आचारांत आणला, तरच पुढील मार्ग सुकर होतो. 'सच्चरितांचें 'निरीक्षण' करण्याचें आज कित्येक महिने माझ्या मनांत घोळत होतें; पण आतां जेव्हां त्याला प्रत्यक्ष आचाराची जोड मिळाली, तेव्हांच तें प्रकटलें. येथपावेतों किती विचार-विकल्पच म्हणणें रास्त-आले व गेले; तेव्हां कांहीं तरी करा, एक निश्चय करा व तो प्रयत्नपूर्वक आचारांत आणा. दिवसापोटीं कांहीं वेळ तरी परमेश्वराप्रीत्यर्थ अर्पण करा. जसें कांहीं झालें तरी आपणास नोकरीची वेळ टाळतां येत नाहीं; कारण तें पोटावरच बसेल. तसेंच परमेश्वरचिंतन हें मनाचें अन्न आहे व जर आपण वेळ टाळली, तर मन उपाशीं राहील. त्याला शांतता मिळणार नाहीं. अशी दृढ भावना करून दिसामाजी कांहीं तरी वेळ मनाला परमेश्वरचिंतन करण्यास द्या. त्याला दैहिक बंधन घाला.जेवतांना तरी आपण खात असलेल्या अन्नाकडे आपलें लक्ष सतत असतेंच असें नाहीं. म्हणून कांहीं आपण उपाशीं राहत नाहीं. खाण्याची क्रिया केली, कीं पोट भरण्याचें काम निसर्ग करतोच आहे. तसेंच परमेश्वरचिंतन करीत असतांना मन त्यांत आरंभीं तन्मय रहाणार नाहीं.तरी आपण

त्याचें अन्न त्याला देण्याची क्रिया केली कीं, निसर्ग त्याचें पोट भरण्याची हमी घेईलच. मन विषयांना चटाळलेलें असल्यापुळें, जसें उपहारगृहाची चटक लागलेल्यास घरचें अन्न गोड लागत नाहीं, त्याचें लक्ष 'चहाभजांवर'च जात असतें तसेंच मन मोकाट भटकेल. त्याला खुशाल भटकूं द्या. पण देहानें तुम्हीं त्या नेमलेल्या वेळीं नेमलेलें परमेश्वरचिंतन करण्यास चुकूं नका; मनाला पति करून तुम्हीं त्याची एकनिष्ठ पत्नी व्हा ! व आपल्या कर्तव्यांत तत्पर असा. त्यांत कुचराई करूं नका ! हा निश्चय अमलांत आणतांना नाना अडचणी येतील : मन मोकाट सुटेल; तोंडानें नामस्मरण चाललें असतां मन गटार उपसायला जाईल. वाईट विचार येतील, नाना विकल्प येतील; पण या सर्वांना धुडकावून तुम्हीं आपलें कर्तव्य करा. त्यांत चुकूं नका : कीं तुमच्या पातिव्रत्याचें-तपश्चर्येचें-फळ परमेश्वर तुम्हांला खात्रीनें देईल ! "कलमें निजधर्मानुसार। हर्ष निर्भर पडे तो" । ३–१३१. रोहिल्यानें आपलें कर्तव्य केलें, म्हणूनच तो बाबांना 'अतिप्रिय वाटे'॥ ३-११९. तेव्हां तुम्ही आपलें कर्तव्य केलेंत, कीं परमेश्वर तुमच्यावर कृपा करीलच ! कारण 'कोठेंही असा, कांहींही करा। एवढें पूर्ण सदैव स्मरा। कीं तुमच्या इत्थंभूत कृतीच्या खबरा : मज (परमेश्वरा) निरंतर लागती॥" ३–१४३. व अनन्य शरणं यो मां भक्त्या भजति भूमिप। योग क्षेमौच तस्याहं सर्वदा प्रतिपादये॥" ७–२०. ग. गी. हें त्याचें ब्रीद आहे. भक्तिमार्गांत एकदां पडल्यावर परमेश्वर आपल्या भक्तांना चरकांत घातल्याप्रमाणें मोक्षाकडे खेंचतो. त्याचें स्मरणपूर्वक तुम्हीं कर्तव्य करा, कीं तें तुम्हांला बाधक न होतां साधकच होईल. 'मदर्थे यानि कर्माणि तानि बध्नन्ति न क्वचित्' (ग. गी. २–९.)-तुम्हीं याप्रमाणें वागलांत, कीं मन आपोआप ताळ्यावर येईल व साधकावस्थेंत–पति मार्गावर येईपर्यंत जो तुम्हांला त्रास पडला, इंद्रियांना व विषयांना जो निर्बंध घालावा लागला, तो सिद्धावस्थेंत पडणार नाहीं. मन पति-स्वैरवर्ति न होतां तुमच्या तंत्रानें चालेल. तुम्ही आत्मोन्मुख होऊन स्वानंदसुख चाखाल, जीवात्मा मुक्त होईल व इंद्रियें प्रारब्धप्रणित

कर्में निष्काम करून विषयसौख्य घेतील; तुम्हीं जीवन्मुक्त–देही असून विदेही–व्हाल.

('मन ताळ्यावर कसें येतें' याचें सोपपत्तिक व उद्‌बोधक विवरण श्रीउपासनींनीं आपल्या 'अनुष्ठान' या प्रसिद्ध प्रवचनांत केलें आहे. इतकें सुंदर व सोपें विवेचन माझ्या इतरत्र वाचनांत आलेलें नाहीं. )

## 'तयांस पहिलें वर्जावें ।' ३–७८

' कांहीं केलें काय झालें । ..................
...................... । अक्षय ठेवा लाधेल ॥ '

३–७८ ते ८२

ह्यांत भक्तिमार्गांत शिरलेल्या साधकानें कोणती सावधगिरी राखावी, काय निर्बंध पाळावेत, याबावत श्रीबाबांनीं इषारा दिला आहे:—

" राज–विद्या राज--गुह्यं पवित्रमिदमुत्तमम् ।
प्रत्यक्षावगमं धर्म्यं सुसुखं कर्तुमव्ययम् ॥ "

भ. गी. ९–२

' भक्तिमार्ग ' हा राजमार्ग खरा ! पण राजमार्गानें जाणाऱ्यालाही बरेच निर्बंध पाळावे लागतात:– उ० फूटपाथवरून चालावें, गाडया डाव्या बाजूनें हाकाव्या, नाक्यावरच्या पोलिसच्या हाताकडे नजर ठेवावी, वाटेल त्या ठिकाणीं लघुशंका करूं नये, इ. अनेक निर्बंध राजरस्त्यावर आपणांस पाळावे लागतात व त्यांचें उल्लंघन केल्यास त्याचें शासनही आपणाला भोगावें लागतें. तोच न्याय भक्तिमार्गांतही आहे. मी माझ्या वडिलांबरोबर लहानपणीं ज्या वेळीं प्रथमच दर्शन घेतलें,त्या वेळीं साई-सत्‌-शिष्य श्रीहरेरामबाबा यांनीं माझ्या वडिलांना जें सांगितलें, तें माझ्या

मनावर बिंबलें व त्यामुळेंच माझी वृत्ति संतांविषयीं आदरभावयुक्त अशी बनली ! ते म्हाणाले " आधीं साधूच्या दर्शनास जाणें व नादीं लागणें हा **गाढवपणा** आहे. पण नंतर त्यांची निंदा करणें हा **महागाढवपणा** आहे." येथेंही श्रीबाबांनीं हाच इषारा भक्तांना दिला आहे. आतां आपल्या-पैकीं जे त्यांचे किंवा इतर कोणाचे भक्त बनले आहेत, त्यांनीं 'नादीं लागण्याचा' गाढवपणा केला आहेच. तेव्हां आतां जर आपल्याला निजहित ( मोक्ष ) हवें असेल, तर आपण आतां निंदा करण्याचा महागाढव-पणा करतां नये. भक्ति जडणें सोपें असतें. पण तीच भक्ति कायम राखणें फार कठीण जातें ! तेथें अनेक उपाधि आडव्या येतात. लोक कुचेष्टा करतील, 'बुवा'च्या नादीं लागला म्हणतील, 'प्रज्ञाहत' झाला म्हणतील; सदासर्वदा आपल्या मनाजोग्या गोष्टी नाहीं झाल्या, म्हणजे मन बावरेल; मग असेल 'जें जें ललाटीं लिहिलें । तें तेंच जरी होणार वहिलें । मग तें गुरुवीण काय कीं अडलें ॥' २-१११. असे विकल्प उठतील, व्यावहारिक आपत्ति येतील, त्या नच टळल्या, तर 'हीच काय गुरुचि उपयुक्तता ।' २-१०८ असें वाटूं लागेल. गुरूचे आचारविचार मनाची चलविचल करतील; पैसे घेणारा, बायका नाचविणारा असा गुरु कसला असें वाटूं लागेल. संतांनीं वर्णिलेलीं संतांचीं लक्षणें आपल्या गुरूला लावून पहाण्याचा मोह अनावर होईल. द्वैतभाव-हा संत चांगला कीं तो चांगला-उत्पन्न होईल इ. इ. हरएक आपत्ति येतील. पण सद्भक्तानें त्यांना थारा देतां नये; तर जें आपल्याला पचत नाहीं तें 'अमृत असलें तरी विष समजून तयांसी पहिलें वर्जावें' ३-७८ व 'पडल्या सहावे कष्टही ॥' ३-७९ व 'लाग्याबांध्यावीण विशेषीं । कोणी न येई आपुल्यापाशीं ।' ३-८१ हें आदर्श तत्त्व जाणून 'श्वान शुकर कीं माशी । हडहड कुणाशीं करूं नये ॥' ३-८१. मनांत विकल्पांना थारा न देतां आपली निष्ठा ढळूं देऊं नये व जो कोणी आपला हितचिंतक आहे, तो कितीही हीन असला, श्वान, सूकर कीं माशी, तरी त्याची निंदा करूं नये ! आपली अंतर्निष्ठा

कायम राखून, सर्वांना शक्यतों समतेनें व सौम्यतेनें वागवावें. अशा रीतीनें करावी यानें ( सद् भक्तानें ) माझी सेवा म्हणजेच—आधीं नाहीं—'करुणा येईल देवाधिदेवा' व 'अक्षय ठेवा लाधेल ॥' ३-८२.

येथें बावांनीं **अक्षय ठेवा लाधेल** हें जें म्हटलें आहे, तें प्रत्येक भक्तानें लक्षांत ठेवावें. 'अक्षय ठेवा' म्हणजे स्वरूपानंद-मोक्ष-लाधेल; कामनिक सर्वच लाभेल असें नाहीं! कारण कामनिक भक्तीचें फळ नियतिनियमास अनुसरून भक्ताच्या पूर्वकर्माप्रमाणें परमेश्वर देत असतो.

**'करुणा येईल देवधिदेवा'** ३-८२. येथें देवाधिदेवा हा शब्द फारच महत्त्वाचा आहे. "अध्यात्मदृष्टया विचार केला, तर प्रतीक ( प्रतीक म्हणजे उपासनेसाठीं जरूर लागणारी नामरूपात्मक वस्तु, गुरु, मूर्ति इ. ) म्हणजे एक प्रकारचें साधन असून खरा सर्वव्यापि हा नित्य परमेश्वर यांपैकीं कोणत्याही प्रतीकांत असूं शकत नाहीं. भक्तिमार्गात मनुष्याला तारण्याची जी शक्ति आहे,ती सजीव अगर निर्जीव मूर्तीत किंवा दगडाच्या इमारतींत नसून या प्रतीकापेक्षां श्रेष्ठ अशी जी **ईश्वरभावना** सदर प्रतीकाच्या ठायीं उपासक आपल्या सोयीसाठीं ठेवीत असतो, तीच खरी तारक होय. प्रतीकाच्या ठिकाणीं जशी तुमची भावना असेल, तसें तुमच्या भक्तीचें फळ परमेश्वर ( देवाधिदेव )—प्रतीक नव्हे, तुम्हांस देत असतो. फळ तुमच्या भावाचें आहे, प्रतीकाचें नाहीं....सर्व वर्गाचें फळ देणाऱ्या परमेश्वराची ( देवाधिदेव ) दृष्टि भक्तांच्या भावाकडे असते, म्हणून "देव भावाचा भुकेला।" प्रतीकाचा नव्हे, असें तुकोबांनींही म्हटलें आहे. ( एकनाथ तर 'भाव तोचि देव' अशी ग्वाही देतात. ) भक्तिमार्गाचें हें तत्त्व ज्याला कळलें, त्याच्या मनांत मी ज्यांची उपासना करतों तेंच ईश्वरस्वरूप किंवा प्रतीक खरें असून इतर प्रतीकें खोटीं हा दुराग्रह न राहतां 'कोणाचें प्रतीक कसेंही असो, तद्वारा परमेश्वराचें भजन करणारे एका परमेश्वरालाच पोंचतात.' अशी उदार बुद्धि उत्पन्न होते. ( गीतारहस्य

प्र. १३ ) व आपल्या प्रत्येक भक्ताची बुद्धि अशीच उदार व्हावी म्हणून 'अल्लामालिक' 'देवाधिदेव,' 'श्रीहरि,' इ. शब्द सदैव तोंडांत ठेऊन श्रीबाबांनींही हाच आदर्श आपल्यापुढें ठेविला आहे.

### " मग ही पूजा करावी कैसी।" ३-८३

येथपावेतों श्रीबाबांनीं स्थूल मानानें भक्तिमार्गाचें अध्यात्मिक दृष्टया विवरण केलें. पण भक्तिमार्गाचें अंतिम ध्येय काय? 'मी कोण, कैसा जाणावा भरवसी।' ३-८३. ह्याचें विवरण ओंव्या ८३ ते १०७ मध्यें केलें आहे. त्यांचें सार श्रीदत्तभार्गवसंवादांत ( प्र० ४ ) खालील तीन श्लोकांत उत्तम दिलें आहे—

**श्लोक** ( इंद्रवज्रा )

" चैतन्य आत्मा जन हो भजा रे ,
वर्जूनियां चेत्य पदार्थ सारे; ।
" तें चेत्यही याविण अन्य नाहीं,
हें दर्पणींचें प्रतिबिंब पाहीं. ॥ १ ॥

" जें चेत्य, चैतन्यचि तें तसेंच
मी; स्थूल सूक्ष्मातिक तेंच साच.
सर्वांस चैतन्यचि भासवीतें
त्याचें स्वयें भान सदैव होतें. ॥ २ ॥

" या लागिं चैतन्याचि एक सेवा,
ज्याचा असे आश्रय सर्व भावां;
सांडोनि सारा भ्रम दूर वेगीं,
साधा अहो ! चिन्मय दृष्टियोगीं. ॥ ३ ॥"

**"हरिनिज भक्तांचा केला।"** ३–९ ( ओवी सार ९ ते १७

अनन्य शरणो यो मां भक्त्या भजति भूमिप ।
योग क्षेमौच तस्याहं सर्वद प्रतिपादये ॥ ग. गी. ७. उ०
' हरि निज भक्तांचा केला । भाळ्या भोळियांचा भुकेला ।
प्रेमालागीं समूळ विकाला ।–'' ३-९. खरा ! पण केव्हां व कोणाला ?
तर,

' जो ईश्वरप्रेमें वेडा झाला । रात्रि दिवसाचा आठव निमाला ।
तेजें प्रभुवरि रुसवा धरिला । तरी तो शोभे ॥
सर्व आहे ईश्वर कर्ता । हें तयासचि शोभे बोलता ।
जयाचा विषय सर्वथा । नारायण ॥
जयाचें हरिगुणावीण । रितें न होती पळभरही श्रवण ।
जयाचें पाहूं न शकती लोचन । हरिचरणांवीण आणिका ॥
निंदा आणि स्तुति । या दोन्ही न रिघती हृदयप्रांतीं ।
एवं परमात्मा सर्वांभूतीं । पहातचि जो ॥
**तयाचा** सर्व कर्ता गोविंद । येथें अन्यथा नाहीं शब्द ।
( परंतु आम्हां प्रापंचिकांचा आमुचा तंव प्रबंध । याहुनि भिन्न ॥
आम्हां घडिभरी आवडे सगुण । घडिभरी आवडे निर्गुण ।
निंदितो भोळ्या भाविका कारण । आणि स्त्रियांचे वचनीं श्रद्धा ॥
ऐकतां श्रीहरिचे गुण । प्रेमजळें न भरति नयन ।
मूर्ति पहातो याचि कारण । शिल्पकार कैसा म्हणोनि ॥
निंदा आणि स्तुति । यांची चित्तांत सर्वदा वसती ॥
आणि आळस द्वाड मात्र चित्तीं । जोडला एक ॥
जेवावयास पाहिजे आधीं । कार्य कराया मत्सरी बुद्धि ।
प्रेयसास कृपानिधी । नाहीं परमात्मा ॥''

( श्री गुलाबरावमहाराज संप्रदाय सुरतरु अ० २० )

"परमात्मा अशा आळशी लोकांकरितां नाहीं. तर खऱ्या भक्तांकरितांच तो कृपाळू आहे. असे भक्त झाल्यानंतरच संकटाच्या वेळीं देवाला हाक मारण्याचा आपणास हक्क पोंचतो. तो हाकेला धावून येतो व कर्मबंधांतून मुक्त करतो" ( श्री. कामतकृत 'नामचिंतामणि' )

"प्रेमें घेईल जो मन्नामा। " ३-११

" जरि पाहिजे मुक्ति। तरी आदरावी नवविधा भक्ति।
जिणें येथें मिळे भुक्ति। अंतीं मुक्ति अनायासें ॥ १२ ॥
" स्मरण आणि वंदन। सख्य, सेवन आणि अर्चन।
दास्य, श्रवण, कीर्तन। सर्व निवेदन नवविधा भक्ति ॥ १३ ॥
" भक्ति ज्ञानाची माउली। करि कृपेची साउली ॥
जिनें नामरूपा आणिली। ब्रह्ममूर्ति भली, अनायासें ॥ १७ ॥
" निर्विशेष परब्रह्म। साक्षात्कार करितां श्रम ॥
घडे मंदां त्याचा भ्रम। वारी क्रम दावुनि ॥ १८ ॥

( श्रीदत्तमहात्म्य अ० १ )

या नवविधा भक्तींचा अनुक्रम स्वानुभवसुलभ असा प्रत्येकजण निरनिराळा लावतात. श्रीदत्तमहात्म्यांत खालील अनुक्रम दिला आहे:—१ स्मरण, २ कीर्तन, ३ श्रवण, ४ सेवन, ५ अर्चन, ६ वंदन, ७ दास्य, ८ सख्य व ९ आत्मनिवेदन:—त्याचें विवेचनही फार सुंदर केलें आहे. विस्तारभयास्तव सर्वच येथें घेतां येत नाहीं. पण श्रीबाबांनाही निदान प्रस्तुत अध्यायांत तरी हाच अनुक्रम संमत दिसतो. म्हणून 'स्मरण'भक्तिच सर्वश्रेष्ठ कां व कशी याचेंच तेवढें विवेचन करूं.

" स्मरणभक्ति अतिश्रेष्ठ। तीं नवांमाजि वरिष्ठ ॥
आठांत्र्याही व्यापी अरिष्ठ। भगवत्श्रेष्ठ ती जाणा ॥ २१ ॥
" ज्याचीं अंगें सहस्र। ज्याचीं स्वरूपें सहस्र ॥
ज्याचीं नामें सहस्र। कर्में सहस्र जयाचीं ॥ २२ ॥

" ह्या सर्वांचें स्मरण । भावें करितां प्रतिक्षण ।।
उतरे सर्व कर्मांचा शीण । लाभे निर्वाण सहजचि ।। २३ ।।
" जातां, येतां, काम करितां । खातां, पितां, देतां, घेतां ।
हृदयीं भगवत्स्मरण करितां । अकर्मता कर्मांची ।। २४ ।।
" स्मरणाविणें न घडे कांहीं । म्हणोनि श्रेष्ठ स्मरण भक्ति ही ।।—"
—२५ श्रीदत्तमहात्म्य अ० १

आपण वर पाहिलेंच आहे कीं, 'मन एव मनुष्याणां कारणं बन्धमोक्षयोः ।।' कोठलीही भक्ति अंगीकारली, तरी ती मनाला जाऊन भिडल्याखेरीज जीवात्मा मुक्त होत नाहीं. कारण—

" मन इंद्रियांचा राव । मनें रूपीं घेतां ठाव ।।
इंद्रिया न मिळे वाव । बाहेर धांव घ्यावया ।। ६७ ।।
" —मना परमानन्द । होतां इंद्रियांचा छंद ।
पूर्ण होई जाई खेद । हा स्वाद दुर्लभ ।। ७० ।।
" घडूनी येतां ध्यान । रूपीं रमे मन ।।
इंद्रियेंही तें स्थान । सर्वथा न सोडती ।। ७१ ।।
—श्री. द. म. अ० ३७

—आणि अशी ही मनाची अवस्था एक 'स्मरण' भक्तिच करूं शकते. इतर आठही भक्ति शेवटीं 'स्मरणं' रूपानेंच मनाला भिडतात. अतएव स्मरणभक्तिच एकमेव श्रेष्ठ ठरते. आणि म्हणूनच—

" येणें वडावी सद्गुरु भक्ति । पावावी संसारीं विरक्ति ।।
जडो गुरु स्मरणीं प्रीती । होवो मति निर्मल ।।
" ऐसीच बुद्धि धरोनि मनीं । कृपा केली साईनाथांनीं ।।
मज निमित्ता पुढें करोनि । स्वयें करणी हे केली ।। "
३—६२—३

" इति तृतीयाध्याय निरीक्षणम् "

—

## श्रीबाबांच्या जवळील

# गुरु-गीता ?

(ले.—**सुमनसुंदर**)

**श्रीराधेश्याम बाबा** या नांवानें ओळखिल्या जाणाऱ्या एका विभूतीशीं माझा नुक्ताच परिचय झाला. प्रस्तुत लेखाचा विषय त्यांच्याच तोंडून मला कळला व पुढेंही श्रीसाईबाबांविषयीं उपयुक्त अशी माहिती त्यांच्यकडून मिळाल्यास श्रीलीलेच्या वाचकांना ती सादर करण्याचा माझा मानस आहे. करितां मला त्यांच्याविषयीं जी काय माहिती आहे, ती येथें देऊन त्यांचा अल्पपरिचय श्रीलीलेच्या वाचकांना प्रारंभीं करून देत आहें. ते आळंदीच्या बाजूचे असून त्यांनीं योगसाधन व पर्यटन बरेंच केलें आहे. व्यक्ति वयानें ७०।८० च्या घरांतली असेल. पण वृत्ति अगदीं बाल व निरभिमानी आहे. यष्टि कृश असली, तरी तेज:पुंज आहे व तरतरी तर एखाद्या तिशीच्या तरुणालाही लाजवील अशी आहे. वेषभूषा पण अगदीं साधी ! दाढी जरा वाढलेली, कधीं कफनी परिधान करतात, तर कधींकाळीं छाटीच कमरेला कसतात. योगाबाबत '**शिवस्वरोदय**' या पुस्तकावर त्यांचा विशेष भर दिसतो. एकदां तत्संबंधीं ते मला म्हणाले, "अध्यात्म मार्गांत तें अखेरचें पुस्तक आहे. ज्याला तें आकळलें तो मुक्त झाला." त्यांच्या प्रवचनाची भाषा फटकळ व अशुद्ध असून विचारांची मांडणी पण क्लिष्ट असते. त्यांच्या प्रवचनाचा सर्वसाधारण आशय असा, "एक आत्माराम ओळखला कीं बस. मी त्यालाच ओळखतों. दुसऱ्या कोणाला ओळखत नाहीं. ज्या देवाचें रक्षण आपल्यास करावें लागतें. तो आपलें कसें करणार ? भक्त इकडे बोंबलतो, आणि देव देवळांत बसतो ! त्यापेक्षां

'आत्माराम' म्हणतांच जी हुजूर करणाराच देव शोधावा. मग कशाच अडचण पडत नाहीं. कारण हाक मारतांच तो ठायींच्या ठायीं, पहाल तेथें व पहाल त्याच्यांत हजर आहे."

त्यांनीं इतरत्र केलेल्या कार्यासंबंधीं मला विश्वसनीय अशी माहिती नाहीं.पण अलीकडेच लोणावळ्याजवळील **'कार्ल्यांचीं कोरींव लेणीं'**-वाबत त्यांनीं बरेंच मनावर घेतलेलें दिसतें. तेथें होणाऱ्या नवसादिकांच्या व पशुपक्षीहत्येला त्यांनीं बराच यशस्वी आळा घातला. दर एकादशीला तेथील गादीपुढें दिंड्या सुरू केल्या व गतवर्षापासून म्हणजे माघ शु॥ २, १८५८ पासून 'धर्मबीजे' निमित्त तेथें उत्सव सुरू केला. त्या लेण्याबाबत ते एकदां म्हणाले, "लेण्याच्या दरवाजावर ३८ अक्षरें कोरलेलीं आहेत. त्यांचा अर्थ कोणीं सांगूं शकत नाहीं. तशींच अक्षरें हस्तिनापुर व कुरुक्षेत्र येथील दरवाजांवर आहेत. २००० वर्षांनीं जागृति होणार होती. पैकीं १८३० वर्षें गेलीं. पण अजून सुमारें २०० आहेत. तेथपर्यंत थांबणें आपल्यास धीर नाहीं. अपले प्रयत्न त्याच्या आधीं. जागृति करण्याकरितां आहेत."

ते आले कीं त्यांचा मुक्काम माझ्या शेजारच्या विऱ्हाडांत असतो व तेथेंच त्यांच्यामाझ्या मुलाखती होतात. असो. एवढा परिचय पुरे; आतां मुख्य विषयाकडे वळूं !

## रविवार तारीख २१ मार्च १९३७ ची गोष्ट !

प्रथम मला एक सांगितलें पाहिजे कीं, आधींच त्या दिवशीं माझा 'दत्त' मला भेटला होता. त्यामुळें माझी वृत्ति विशेष उल्लसित होती. रात्रीं आठाचा सुमार होता. मी काम आवरून रेल्वेनें घरीं येण्याच्या तयारींत होतों. त्याच समयीं उपरोक्त 'बाबा' शेजारीं असल्याचें कळलें गाडी चुकेल म्हणून मी जाण्यास आळंटाळं करीत होतों. पण एका मित्रानें उभ्याउभ्या दर्शन घेऊन जाण्याचा आग्रह केला व मीही आढेवेढे न घेतां गेलों. मी

जातांच ‘बाबां’नींच माझ्या पायावर प्रथम डोकें ठेविलें व ते एकदम उद्गारले “ आज साईदर्शन झालें; तुम्हांला पाहिलें कीं मला साईबाबांची आठवण येते !” मी स्तंभितच झालों. वय, रूप, वेष, व्यवसाय इत्यादींत श्रीबाबांच्यांत व माझ्यांत यत्किंचित् सुद्धां साम्य नसतांना यांनीं असें कां म्हणावें हेंच मला कळेना ! ( आतां इतक्यांतच याचा मला बोध होतो तो असा कीं, श्रीबाबांच्या लीलांचें निरीक्षण मी करतों. तेव्हां त्यांच्या लीला माझ्या कानीं पडल्यास मी त्या संग्रहित करीन व त्या श्रीसाईभक्तांना उपयुक्त ठरतील या हेतूनें त्यांना श्रीबाबांच्या लीला मला सांगण्यास स्फूर्ति झाली असावी. ) मी म्हणालों “ कोठें तो कोहिनूर आणि कोठें मी फत्तर ? ” बाबा म्हणाले, “ तें कांहीं असो; पण मला आठवण झाली खरी ! ” नंतर त्यांनीं श्रीबाबांच्या सहवासांतील आपले कांहीं अनुभव सांगितले !

**बाबा म्हणाले**—“ श्रीबाबांच्या आसन घालण्याच्या विवक्षित पद्धतीवर नेहमीं वाद चालत असे. **बाबा साईं, बाबा जान** व **बाबा ताजुद्दीन** यांच्या गप्पा चालावयाच्या. एकदां ताजुद्दीनबाबांच्या दर्ग्याच्या खांबाला आग लागली. इकडे साईबाबांनीं जवळचें एक मडकें हातांतील सटक्यानें फोडलें आणि धूम पिटीत बसले; आम्हीं विचारलें ‘ असें कां ? ’ तर बाबा म्हणाले, “ ताजुद्दीन बाबा का दर्गा जळता है; ओ बुझाता है !” आणि दुसऱ्या दिवशीं तसें पत्र खरोखरच आलें. एकदां एक इसम श्रीबाबांच्या दर्शनाला येतांच “माझे ३० रु. १४ आ.काढ !” असें बाबा त्याला म्हणाले. आणि त्याच्या खिशांत नेमके तेवढेच निघाले. ते घेऊन मग त्याला टांग्यांतून स्टेशनवर पोचता केला. **बाबांपाशीं एक सात अध्यायी लहानशी गुरुगीता होती. तिला हिरवी नाडी होती. नेहमीं कफनीच्या डाव्या बाजूच्या खिशांत ती ते ठेवीत व एकांतांत वाचीत.** त्याच्यांत तर त्यांचें सर्व होतें ! साई म्हणजे परमात्मा ! ”

मीः—खरोखरच तो परमात्मा होता व तेंच त्यांच्या चरित्रावरून दाखविण्याकरितां मी लेख लिहीत आहें."

**बाबाः—" नव्हे, नव्हे ! तो दत्त होता !"**

माझी गाडी सुटण्याची वेळ झाली व त्यामुळें प्रिय असला तरी हा विषय येथेंच आटोपता घ्यावा लागला व मी निरोप घेऊन निघालों.

वरील माहितींतील विशेष म्हणजे " **बाबासाई, बाबाजान व बाबाताजुद्दीन यांच्या गप्पा चालत** " हा एक व दुसरा " **श्रीबाबांच्या जवळ गुरुगीता चालत होती.** " श्रीसाई-सच्चरितांत ह्यांचा उल्लेख नाहीं व साईलीलेंत पूर्वी कधीं यासंबंधीं माहिती आली असल्यास ती माझ्या अवलोकनांत आलेली नाहीं. आज साईबाबांचा सहवास ज्यांना सतत दीर्घकालपर्यंत लाभला अशी, भक्तमंडळी ह्यात आहे. तेव्हां त्यांच्यापैकीं कोणी आपल्या अधिकारवाणीनें यावर प्रकाश पाडला तर माझ्यासारखे वाचक व लेखक त्यांचे ऋणी होतील. मी जरी अशी मिळालेली माहिती पुरविली, तरी ती वरपांगी ठरणार आहे; उलट त्यांनीं पुरविलेली माहिती अनुभवपुरःसर अतएव विश्वासार्ह ठरेल.

विशेषत. ' **बाबांजवळील गीता कसली होती याचा खुलासा व्हावा; इतकेंच नव्हे तर ती गीता अक्षरशः लीलेंत प्रकाशित व्हावी** ' अशी माझी उत्कट मनीषा आहे. बाबांच्या भक्तांपैकीं कोणी ती पुरवील काय ?

जयदत्त !

---

|| श्री साईनाथ प्रसन्न ||

कृ. सा. न. वि. वि. श्री साईबाबा शिर्डी संस्थान कमिटीकरितां शके १८५९ ते १८६१ चे त्रैवार्षिक भक्तमंडळाची निवडणूक संस्थान स्कीम-प्रमाणें व सभासदांच्या सोईकरितां रविवार दिवस धरून करण्याचें योजिलें आहे. प्रथम आश्रयदात्यांकडून चार सभासद निवडून देण्याकरितां रविवार ता. ५ सप्टेंबर १९३७ ही तारीख ठरवून त्याप्रमाणें त्या वर्गाच्या सभासदांकडे मतपत्रिका रवाना केलेल्या आहेत. त्यानंतर तहाहयात व सामान्य सभासद यांजकडून होणाऱ्या निवडणुकी अनुक्रमें ता. १९ सप्टेंबर व ३ ऑक्टोबर १९३७ ह्या तारखांस त्या त्या वर्गाच्या सभासदांकडे वेळींच मतपत्रिका पाठवून करण्यांत येतील. सदरहूप्रमाणें निवडणुकी खालील पत्त्यावर ऑ. चिटणीस यांच्या ऑफिसांत होतील; तरी त्या त्या निवडणुकीच्या दिवशीं आपण कृपा करून अवश्य हजर राहण्याचें करावें. कळावें, लोभ असावा, हे विनंति.

३७ चरई, ठाणें
ता. २० आगस्ट
१९३७.

आपला नम्र,

**श्रीधर नारायण खारकर**

ऑ. चिटणीस, शिर्डी संस्थान कमिटी

॥ श्री साईबाबा ॥

# शके १८५९ ते १८६१ पर्यंत शिर्डी संस्थान कमिटीची त्रैवार्षिक निवडणुकीकरतां

## श्री. साईबाबा शिर्डी संस्थानच्या भक्तमंडळाच्या सभासदांची यादी

## शके १८५८

### आश्रयदाते

१ शेट मुसाहाजी अली खत्री

२ श्रीयुत विठ्ठलदास राघवजी ठक्कर.

३ श्री. श्रीराम सदाशिव तांबे

४ ,, त्रिभुवन जमनादास

५ ,, मगनलाल नथुराम दवे.

६ ,, मोतीलाल माणिकचंद उर्फ प्रतापशेट

७ × श्रीमंत केशवराव गोपाळ बुटी.

८ श्रीमंत पूर्णचंद्र गोपाळ बुटी.[२]

९ ,, नागेश आत्माराम सावंत.

### सन्मान्य सभासद

१ × ह. भ. प. गणेश दत्तात्रय सहस्त्रबुद्धे ऊर्फ दासगणू महाराज[२]

२ + श्रीयुत माधवराव बळवंत देशपांडे[८]

### तहाह्यात सभासद

१ श्रीयुत आत्माराम लाडोबा आरोलकर.

२ श्रीमती पार्वतीबाई ओझरकर.

३ ,, शंकर सीताराम कर्णिक.

४ श्री. केशव महादेव करंदीकर.

५ ,, रामकृष्ण जनार्दन करंदीकर.

६ श्रीमती दुर्गाबाई कातुतकर.

७ श्रीमती रमाबाई कामत.

८ श्रीयुत आनंदजी हीरजी कुंभार.

९ श्रीयुत जिवनराव बाळकृष्ण कोठारी.

१० ,, गणपतराव मोरेश्वर कोठारे.

११ ,, शामराव भास्कर कंटक.

१२ ,, खेवारी कुर्ला अमेच्युअर नाटक क्लब.

१३ × रा. सा. यशवंत जनार्दन गाळवणकर.[२]

१४ श्रीमती जनाबाई सीताराम घटे.

१५ डॉ. क्या. बी. आर चांदोरकर.
१६ ट्र.श्रीयुत वासुदेव नारायण चांदोरकर.
१७ श्रीयुत माधवजी झीणा ठक्कर
१८ श्रीयुत श्रीनिवास बाळकृष्ण देव.
१९ ,, श्रीपाद बाळकृष्ण देव
२० सौ. उमाबाई श्रीपाद देव.
२१ सौ. कमळाबाई श्रीनिवास देव.
२२ ,, जानकीबाई बाळकृष्ण देव.
२३ ट्र. श्रीयुत बाळकृष्ण विश्वनाथ देव.[१०]
२४ ,, विष्णु गोविंद देव.
२५ ट्र. रा. ब. सखाराम बळवंत धुमाळ.
२६ प्रोफेसर गणपतराव जी. नरके.
२७ श्रीयुत सुंदरराव दि. नवलकर.
२८ श्री. विष्णु बाळकृष्ण परांजपे.
२९ ,, जाव अंतोन परेरा.
३० ,, गजानन शिवराम पाटणकर.
३१ ,, रामचंद्र वामन पाटणकर.
३२ ,, त्रिंबक गोविंद पाटील
३३ *श्रीयुत रघुवीर भास्कर पुरंदरे.[१०]
३४ ट्र. रा. ब. मोरेश्वर विश्वनाथ प्रधान.[७]
३५ श्रीयुत दामोदर रामकृष्ण बापट.
३६ श्री. लक्ष्मण गणेश महाजनी.
३७ " आनंदराव गणपत शितोळे.
३८ ,, सावळाराम आत्माराम शिरोडकर.
३९ " जमनादास हरकचंद शेट.
४० " कृष्णलाल मनोरदास शेट.
४१ " रजबअली महमद शेट.
४२ " लाला लखमीचंद शेट.
४३ " दत्तात्रय मोरेश्वर सबनीस.
४४ डॉ. केसरीनाथ वासुदेव सावे.
४५ " मोरेश्वर नारायण सावे.
४६ " दाजी विठ्ठल सांबारे.
४७ " डॉ. क्या. व्ही. जी. हाटे.

## सामान्य सभासद.

१ श्रीयुत जी. जी. श्रीयान.
२ सौ. राजलक्ष्मी अमाल
३ शेट त्रिभुवन नरोत्तम अढीया.
४ श्री. नरेंद्र त्रिभुवन अढीया.
५ ,, भगवंत त्रिभुवन अढीया.
६ श्रीमती वेणुताई आगाशे.
७ श्रीयुत केशव गणेश आजरेकर.
८ कु. विमला हरिश्चंद्र आम्रे.
९ श्रीयुत गोपाळ विठ्ठल आरस.
१० शेट अरदेशर नामदार इराणी.
११ श्रीयुत बळवंत हरि कर्णिक.
१२ श्रीयुत नारायण गोविंद काजळे.
१३ श्रीमती काशीबाई कानिटकर.
१४ श्रीमती पिरोजबाई रामराव कोठारे.
१५ श्रीयुत श्रीपादराव शांतमूर्तराव कैकिणी
१६ ट्र. श्री. तात्या गणपत पाटील कोते.[१०]
१७ श्री. श्रीधर नारायण खारकर. चालू चिटणीस. माजी चिटणीस श्री. नवलकर
१८ ,, गोविंद विठोबा खोत.
१९ × श्रीयुत गोविंद काशीनाथ गाडगीळ
२० सौ. लक्ष्मीबाई गोविंद गाडगीळ.
२१ श्रीयुत दत्तात्रय रामचंद्र गोखले.
२२ * श्री. वसंतराव नारायण गोरक्षकर.[८]

२३ सौ. सुशीलाबाई वसंतराव गोरक्षकर.
२४ कु. ताराबाई नारायण गोरक्षकर.
२५ श्रीयुत रामचंद्र वासुदेव घैसास.
२६ श्री. नरहर रामचंद्र घाटे.
२७ सौ. गोपीकाबाई अनंत चित्रे.
२८ श्रीयुत राजाराम निळकंठ चौबळ.
२९ श्री. शामराम रामचंद्र जयकर.
३० ,, दादाजी गोपीनाथ जोशी.
३१ आलीशा उसमानशा झारी.
३२ ,, आनंदराव पुरुषोत्तम डोळस.
३३ कु. नलिनी तर्खड.
३४ सौ. ताराबाई सुरेंद्र तर्खड.
३५ कु. इंदिराबाई तेंडुलकर.
३६ श्रीयुत नीलकंठ सखाराम त्रिलोकय.
३७ श्री. गोपाळ भास्कर दातार.
३८ ,, जनार्दन आत्माराम देसाई.
३९ सौ. कमलाबाई देसाई.
४० श्रीयुत केशवराव बी. धायबर
४१ डॉ. वामन लक्ष्मण नुलकर.
४२ श्रीमती जानकीबाई एल. नुलकर.
४३ श्रीयुत काशीनाथ सखाराम पाटील.
४४ ,, गजानन वामन प्रधान.
४५ ,, नारायण नरसिंह फडणीस.
४६ डॉ. छोटालाल भोलाभाई भट.
( * बाबूराव राघोजी बोरावके.[६] )
४७ श्रीयुत मधुसूदन दत्तात्रय भावे.
४८ श्री. चिंतामण परशराम भिडे.
४९ ,, महादेव जिवाजी महाजन.
५० ,, चंद्रकांत बाळकृष्ण मालवणकर.
५१ ,, वामन रामचंद्र मोघे.
५२ ,, बाळकृष्ण जयराम मंत्री.
५३ ,, वासुदेव केशव मंत्री.
५४ ,, धोंडु मनोहर रत्नपारखी.
५५ शेट डी. एम. राजा.
५६ ,, वामन नरहर रुईकर.
५७ सौ. बाई बाळकृष्ण राऊत.
५८ ,, ना. बा. राणे.
५९ श्री. सदाशिव काशीनाथ लवाटे.
६० ,, गो. वि. वाड.
६१ सौ. वत्सलाबाई जयराम वाककर.
६२ ,, हरि गोपाळ सकपाळ.
६३ श्री. चिंतामण रामनाथ सातघरे.
६४*,, { रामचंद्र रामकृष्ण सामंत चालू खजिनदार.[३] माजी खजिनदार कै. श्री. तर्खड.[६] }
६५ ,, बाळकृष्ण राघव सावंत.
६६ ,, मदनजी भिमजी शेट.
६७ ,, भिमजी भानजी शेट.

**टीपः**—१ ज्यांच्या नांवाच्या आधीं 'ट्र' असें अक्षर आलें आहे, ते संस्थानचे ट्रस्टी आहेत असें समजावें. ते ट्रस्टी असल्यामुळें संस्थान कमिटीचे तहाहयात सभासद आहेत. अर्थात् त्यांचीं नांवें मतपत्रकांत घालण्याचें कारण उरलें नाहीं.

२ ज्यांच्या नांवाच्या आधीं लाल शाईंत "नि" असें अक्षर आलें आहे ते निवडून आले आहेत असें समजावें. अर्थात् त्यांचीं नांवेंही मतपत्रकांत घालण्याचें कारण उरलें नाहीं.

३ ज्यांच्या नांवाच्या मागें * अशी फुली आहे, ते हल्लीं संस्थानकमिटीचे सभासद आहेत; आणि हल्लींच्या कमिटीबरोबर त्यांचीही मुदत पुरी होईल. अर्थात् ते फिरून निवडून येण्यास लायक आहेत.

४ ज्यांच्या नांवाच्यापुढें आंकडा आहे, तो त्या सभासदांनीं शिर्डीसंस्थान कमिटीच्या १० सभांपैकीं किती सभांना हजर होते, हें दर्शवितो.

**श्रीधर नारायण खारकर**
आ. चिटणीस.
शिर्डी संस्थान कमिटी

# श्री सद्गुरु साईबाबा



## पुण्यतिथि

शिर्डी, ता. १५ सप्टेंबर १९३७

कृ. सा. न. वि. वि. आधुनिक संतचूडामणि सच्चिदानंद श्रीसमर्थ सद्गुरु साईबाबा महाराज संस्थान शिर्डी, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर यांची १९ वी पुण्यतिथि येत्या आश्विन शु॥ १० सह ११ शके १८५९ शुक्रवार (ता. १५–१०–३७) रोजीं श्रीक्षेत्र शिर्डी येथें महाराजांच्या मंदिरांत होणार आहे. तरी या समयीं आपण कृपा करून आपल्या कुटुंबांतील बाल-गोपाळांसह व मित्रमंडळीसह श्रींच्या तीर्थप्रसादास अवश्य यावें अशी नम्र विनंती आहे.

**श्री. ना. खारकर,**
प्रशस्य सचिव ( ऑ. चिटणीस ),
३७, चरई रोड, ठाणें.

**रा. रा. सामंत,**
प्रशस्य कोशाध्यक्ष ( ऑ. खजिनदार ),
४५, टर्नर रस्ता, वांद्रे.

**बापुराव रा. बोरावके,**
प्रशस्य दु. सचिव (ऑ. दु. चिटणीस, शिर्डी.)

**रघुवीर भा. पुरंदरे,**
प्रा. दु. कोशाध्यक्ष.(ऑ दु. खजिनदार, वांद्रें.)

आपले नम्र साईदास,

**मोरेश्वर विश्वनाथ प्रधान,**-सान्ताक्रुझ.
**तात्याजी गणपत पाटील कोते,** शिर्डी.
**बाळकृष्ण विश्वनाथ देव,**–ठाणें.
**सखाराम बळवंत धुमाळ,**–नाशिक.
**वासुदेव नारायण चांदोरकर,**–कल्याण.

श्री. साईबाबा **शिर्डी संस्थानचे विश्वस्त ( ट्रस्टीज ).**

# उत्सवाचा कार्यक्रम

## आश्विन शु॥ ९ सह १० शके १८५९ गुरुवार (विजयादशमी) १४–१०–३७ प्रारंभदिन

सकाळीं श्रींचे समाधीवर रुद्राभिषेक, श्रींचे समाधीस मंगल स्नान, वस्त्र-परिधान व षोडशोपचार पूजा; दुपारची नैत्यिक आरति वगैरे.

दुपारीं भोजन, पुराण व चक्रीभजन.

सायंकाळीं सीमोल्लंघन. नंतर सायंकाळची नैत्यिक आरति व भोजन.

रात्रीं पालखीची मिरवणूक, कीर्तन व शेजारति.

## आश्विन शु॥ १० सह ११ शुक्रवार ता. १५–१०–३७ पुण्यतिथिदिन

पहांटे श्रींचे समाधीवर रुद्राभिषेक व पवनाभिषेक.

सकाळीं भिक्षा व श्रींच्या समाधीस मंगलस्नान, पूजा व वस्त्रपरिधान वगैरे.

नंतर श्री. बाळासाहेब देव यांचें श्रीसाईबाबा पुण्यतिथि आख्यान, कीर्तन व दुपारची नित्याची आरति.

दुपारीं पुण्यतिथि-आराधनाविधि, तीर्थप्रसाद व भोजन व नंतर नैत्यिक पुराण व चक्री भजन.

सायंकाळीं ५ ते ६–शिर्डी संस्थान-कमिटीची सभा नंतर सायंकाळची नित्याची आरति व भोजन.

रात्रीं रथाची मिरवणूक, गारुड व शेजारति.

## आश्विन शु॥ ११ शनिवार ता. १६–१०–३७

सकाळीं अभिषेक, स्नान, पूजा वगैरे.

,, ९ ते १२–श्रींचे समाधीपुढें श्री. देव यांचें श्रीसाई दत्त–
जन्माख्यान कीर्तन.

दुपारीं श्रींची दुपारची नैत्यिक आरति, फराळ, भोजन, नंतर चक्रीभजन
व पुराण.

सायंकाळीं नैत्यिक आरति, नंतर भोजन.

रात्रीं पालखीची मिरवणूक व शेजारति.

## आश्विन शु॥ १२ रविवार ता. १७–१०–३७

सकाळीं अभिषेक, स्नान, पूजा वगैरे.

दुपारीं नैत्यिक आरति, भोजन व चक्रीभजन.

,, ३ ते ५–श्रींच्या समाधीपुढें श्री. बाळासाहेब देव यांचें ज्ञानेश्वरीपुराण.

सायंकाळीं नैत्यिक आरति. नंतर भोजन.

रात्रीं कीर्तन व शेजारति.

## आश्विन शु॥ १३ सोमवार ता. १८–१०–३७

नित्य कार्यक्रम व काला कीर्तन. दुपारीं भोजन व पुराण. सायंकाळीं–आरति, भंडारा भोजन, रथाची मिरवणुक, गारुड, व शेजारति.

संस्थान गवयांचीं कीर्तनें उत्सवदिवसांत होतील. पण कीर्तनाच्या वेळा त्यांच्या सोईप्रमाणें त्या त्या दिवशीं ठरवून कार्यक्रमफलकावर प्रसिद्ध करण्यांत येतील.

# " श्रीसाईलीला मासिक "

श्रीसाईबाबा शिर्डी संस्थान कमिटीकडून कळविण्यांत येतें कीं, सदरहू मासिकाचे संपादकाचे व प्रकाशकाचे जागीं रा. रा. रामचंद्र रामकृष्ण सामंत, ४५, टर्नर रोड, वांद्रें, मुं. २०, संस्थानचे प्रशस्य कोशाध्यक्ष (आ. खजिनदार) यांची नेमणूक केलेली आहे. शके १८५८चे राहिलेले मासिकाचे अंक छापत आहेत व ते आतां लवकरच प्रसिद्ध होतील. करितां वर्गणीदारांस विनंती कीं, त्यांनीं आपलीं नांवें व चालू पत्ते संपादकांकडे ताबडतोब कळविण्याचें करावें. वर्गणीदारांनीं पत्ता कळवितांना शके १८५८ ची वर्गणी भरल्याची तारीख व पावती नंबर कळविल्यास व ज्यांनीं अद्याप वर्गणी भरलेली नाहीं, त्यांनीं ती ताबडतोब पाठविण्याचें केल्यास संस्थान त्यांचे आभारी होईल.

श्री. ना. खारकर

प्रशस्य सचिव ( ऑ. चिटणीस ),

श्रीसाईबाबांचें शिर्डी संस्थान,

कार्यवाह कमिटी.

ता. १५ सप्टेंबर १९३७,

३७ चरई, ठाणें.

---

## भक्तमंडळाचे सभासद होण्यास लायकी

श्रीसाईबाबा शिरडी संस्थानच्या कायम निधीस रु. ५०० किंवा अधिक वर्गणी देणारे ते भक्तमंडळाचे आश्रयदाते सभासद, रु. १०० किंवा अधिक कायम निधीस वर्गणी देणारे ते तहाहयात सभासद व रु. ५ भक्तमंडळाची वर्गणी प्रत्येक वर्षी देणारे किंवा संस्थानचे कायम निधीस अगर कोठी फंडांत ( चालू खर्चाकडे ) तेवढीच किंवा अधिक रक्कम प्रत्येक वर्षी देणारे ते सामान्य सभासद. ज्या सामान्य सभासदांकडून चालू साल खेरीज करून मागील तीन्ही सालाचा वसूल आला असेल, त्यांनाच सामान्य सभासदांचे हक्क प्राप्त होतील.

श्रीसाईनाथ

## शिरडी संस्थान व चिंचणकर मिळकत यांसंबंधीं

# निष्कारण उत्पन्न केलेला गैरसमज

श्रीसाईलीला मासिकाचा दिव्यावतार, बाबांच्या पुण्यलीलामृताचें येथेच्छ पान करून आत्मोन्नति करून घेण्याकरतां आहे. वस्तुस्थितीचा विपर्यास करून कोणाच्याही मनोवृत्ति दुखविण्याकरतां किंवा मतभिन्नत्वामुळें एकमेकांवर टीकास्त्र सोडून श्रीसाईलीलेची अमोल जागा अडविण्याकरतां नव्हे.

कांहीं अपरिहार्य कारणांमुळें केवळ अत्यल्प काल श्रीसाईलीलेचें संपादकत्व हातीं आल्याचा फायदा घेऊन नुकत्याच संस्थानखर्चानेंच प्रसिद्ध केलेल्या शके १८५८ सालच्या चैत्र, वैशाख, ज्येष्ठ, व आषाढ, श्रावण, भाद्रपद, या श्रीसाई-लीलेच्या दोन त्रैमासिक अंकांत शिरडीवृत्त, इतर वृत्त, संस्थानवृत्त, संपादकीय, व स्वप्न का दृष्टांत, या शीर्षकाखालीं शिरडी संस्थान कमिटीबद्दल, व कै. दामोदर घनःशाम बाबरे ऊर्फ आण्णा चिंचणकर यांनीं श्रीसाईबाबांस समर्पण केलेल्या मिळकतीच्या विश्वस्तांबद्दल जनतेचा गैरसमज उत्पन्न करणारा मजकूर आला आहे. तोच मजकूर कांहीं शब्दयोजनेच्या फरकानें कांहीं वृत्तपत्रांत, व भक्तमंडळाच्या कांहीं सभासदांच्या तक्रारीअर्जांतही घालून छापून प्रसिद्ध केला आहे. म्हणून केवळ गैरसमज दूर करण्याच्याच हेतूनें त्यासंबंधीं दोन शब्द लिहिणें भाग पडत आहे.

आजपर्यंत संस्थानचें काम एकमतानें सुरळीतपणें चालत असे. तेव्हां मतभेद नव्हते असें नाहीं. पण इतके तीव्र स्वरूपाचे व अहंमन्यतेचे नव्हते. आपण सर्व बाबांचीं लेकरें या निरभिमान बुद्धीनें आपला शैक्षणिक, सामाजिक व औद्योगिक दर्जा विसरून सर्व सभासद एकमेकांबद्दल सहानुभूति व आदर बाळगून काम करीत. आपण सर्व बाबांची सेवा करण्याकरितां कांहीं काल या संस्थेंत एकत्रित झालों आहों, या पुण्य भावनेची विस्मृति पडून दुरभिमानवृत्तीचा उठाव कांहीं अपवादा-त्मक सभासदांच्या अंतःकरणांत उत्पन्न झाल्यामुळें अलीकडे त्यांच्याकडून वरील दोन्ही संस्थांबद्दल सार्वत्रिक गैरसमज पसरविण्याचा उपक्रम सुरू झाला आहे.

संस्थानच्या हिताकडे लक्ष देऊन पूर्वी मतभेद मिटते घेण्यांत येत असत व बहुमतांनीं जे ठराव पसंत होत असत, त्याप्रमाणें अमलबजावणी होत असे. हल्लींही तसेंच होत आहे. बहुमतांनीं पसंत झालेले सर्वच ठराव जर कोणास मान्य नसतील,

तर आपल्या बाजूचें बहुमत करून घेऊन आपल्या मर्जीप्रमाणें ठराव पसंत करून घेण्याशिवाय किंवा योग्य कोर्टाकडून ते रद्द करून घेण्याशिवाय शिष्टसंमत अन्य मार्ग नाहीं.

वरील दोन्ही संस्थेंत सांवळागोंधळ व अनागोंदी कारभार चालतो असा एक त्यांच्या चालकांवर आक्षेप आहे. संस्थानांत प्रत्यक्ष पैशाचा व्यवहार व जमाखर्च करणारी तीनच मंडळी. प्रशस्य सचिव (आ. चिटणीस), प्रशस्य कोशाध्यक्ष (आ. खजिनदार) व धनप्रधान–लेखावर (चेकवर) सही करणारे एक सन्माननीय विश्वस्त.माजी प्रशस्य सचिवांची कारकीर्द शके १८५१ पासून सात वर्षे होती व याच सात वर्षांत जर संस्थानच्या कारभारांत सांवळागोंधळ व अनागोंदी जमाखर्च झाला असेल, तर त्याचा दोष पैशाचा प्रत्यक्ष व्यवहार करणाऱ्या वरील तीन व्यक्तींवरच येतो, असें कोणाही विचारी माणसाला दिसून येईल.वरील आक्षेप सभामंडपाचें काम बंद पडल्यापासून घेण्यांत येत आहे. पूर्वी कधींही घेण्यांत आला नाहीं. सभामंडपाचें काम कां बंद पडलें, याबद्दलची माहिती शके १८५७ सालच्या श्रीरामनवमीच्या उत्सवाच्या वेळीं मोठ्या सभेनें यासंबंधीं जे ठराव केले आहेत त्यावरून स्पष्टपणें कळून येईल.

चिंचणकर-मिळकतीचा प्रत्यक्ष कारभार त्या मिळकतीच्या सर्व विश्वस्तांच्या विचारें चालतो. तो एकाच्या हातीं मुळींच नाहीं.

चिंचणकर मिळकत तिच्यावर असलेल्या सावकाराच्या देण्याच्या ओझ्याखालीं दडपून गेली असल्यामुळें तें देणें देऊन मिळकत गहाणांतून सोडविण्यांत, इतर भाऊबंदांनीं अन्यायानें व जबरदस्तीनें बळकावलेली वेढेगांवची कांहीं मिळकत फिर्यादी देऊन त्यांच्या घशांतून काढण्यांत कुळांवर वारंवार फिर्यादी देऊन मागील व चालू बाकी वसूल करण्यांत, मिळकतीच्या विश्वस्तांच्या कमरेचे टांके आज १४ वर्षें ढिले झाले.

ही मिळकत नुकतीच आतां म्हणजे शके १८५७ अखेर गहाणांतून व इतर सावकारांच्या कर्जांतून व उसनवारींतून मुक्त झाली आहे. पुढील व्यवस्था मिळकतीचे विश्वस्त व संस्थानकमिटीचे व्यवस्थायक यांच्या संमतीनें होत आहे. ही व्यवस्था एकटे देव यांच्याकडे मुळींच नाहीं. मिळकतीच्या विश्वस्तांच्या सल्ल्यानें देव वागतात या मिळकतीचे जमाखर्च प्रथम कै. भक्तवर्य अण्णासाहेब दाभोळकर हे ठेवीत असत. त्यांच्या निधनानंतर देव ठेवूं लागले. त्याबद्दल कोणास कांहीं विचारपूस करावयाची असल्यास त्यांनीं देव यांना समक्ष भेटून आपली खात्री

करून घ्यावी. कोणच्याही "सांवळागोंधळ अनागोंदी" या अप्रयोजक, अस्पष्ट, भ्रामक व लोकांची दिशाभूल करणाऱ्या शब्दयोजनेवर अंध विश्वास ठेवून आपला निष्कारण गैरसमज करून घेऊं नये अशी जिज्ञासु व संस्थानची खरी कळकळ बाळगणाऱ्या हितेच्छु वाचक-भक्तसंघास सविनय प्रार्थना आहे.

श्रीसाईलीला मासिकाच्या वर्ष ६ जोड अंक ८–९–१० पान १ ते ४५ यांत तारीख २८–२–२१ ते तारीख १०–१०–२९ पर्यंतची वरील मिळकतीची साद्यंत माहिती दिली असून त्यावर त्या वेळीं असलेल्या मिळकतीच्या सर्व विश्वस्तांच्या सह्या आहेत. सदर मासिकाच्या वर्ष ७ जोड अंक ९–१०–११ पान १ ते ६ यांत सदर मिळकतीची ता २०–११–३० पर्यंतची माहिती दिली आहे. वर्ष १० अंक ७ चे पान १९ ते २९ यांत याच मिळकतीची ता. १८–७–३३ पर्यंतची हकीकत दिली आहे. ही सर्व माहिती निरनिराळ्या सावकारांची कर्जफेड, वसूल, फिर्यादी, दरखास्ती, व इतर कोर्ट–दरबार यांसंबंधाची आहे. सदर मासिकाचें वर्ष १३ जोड अंक ४–५–६ यांत चार पत्रकें दिलीं आहेत. त्यांतील पत्रक नंबर १ यांत श्रीशिरडी संस्थानकडून वेळोवेळीं म्हणजे शके १८४५–४६ ते शके १८५७–५८ किंवा सन १९२३–२४ ते सन १९३५–३६ पर्यंत चिंचणकर मिळकतीच्या खर्चासाटीं उसनवार व कर्जाऊ घेतलेल्या व परत दिलेल्या रकमांचा हिशोब दिला आहे. पत्रक नं. २ यांत वरील मुदतींत फक्त उसनवार व पत्रक नं. ३ यांत कर्ज किती घेतलें व त्याची सव्याज फेड कशी केली हें दाखवून पत्रक नं. ४ यांत जी शेवटची रक्कम रु. १२९४–१०–६ दिली, तिचा तपशील दिला आहे. ही सर्व माहिती तारीखवार दिली आहे. ती जिज्ञासु भक्तजनांनीं व सहृदय वाचकांनीं कृपेनें अवश्य वाचून पहावी. म्हणजे निष्कारण केलेला किंवा झालेला गैरसमज दूर होईल व संशयनिवृत्तिही होईल.

आतां या मिळकतीसंबंधीं फक्त शके १८५८–५९ म्हणजे सन १९३६–३७ सालच्या जमाखर्चाची माहिती देणें राहिली आहे.ती यथावकाश इतर विश्वस्तांच्या आज्ञेनुसार प्रसिद्ध करण्यांत येईल.कर्ज जाऊन शिल्लक राहिलेल्या उत्पन्नापैकीं शिरडी-संस्थानास मिळणाऱ्या $\frac{3}{4}$ रकमेची व्यवस्था मिळकतीचे विश्वस्त व शिरडी संस्थानच्या मोठया सभेनें केलेल्या ठरावांतील आज्ञेप्रमाणें करण्यांत येत आहे. समाधि मंदिराच्या सभामंडपाकरितां त्यास लागून असलेली जागा खरेदी करणें व बाबांची पडलेली चावडी पुन्हा नवीन बांधणें हीं कामें वरील ठरावानुसार या रकमेंतून नुकतींच केलीं आहेत. यासंबंधानें सविस्तर माहिती श्री. देव यांच्याकडे पहावयास

मिळेल व माजी प्रशस्य सचिवांनीं बहुतेक देवस्थानांच्या व धर्मदाय उत्पन्नाच्या विनियोगासंबंधानें जी भरमसाट निरर्गल व काल्पनिक टीका केली आहे व त्यास केसरी व गोग्रास पत्रांचा आधार दिला आहे, ती वरील मिळकतीसंबंधीं आतांपर्यंत श्रीसाईलीला मासिकाच्या उपरिनिर्दिष्ट केलेल्या तीन्ही जोड अंकांतून वेळोवेळीं प्रसिद्ध केलेल्या वृत्तांतावरून, कागदपत्रांवरून व हिशोबावरून, कशी निराधार व अस्थानी आहे, हें कोणाही चाणाक्ष वाचकाच्या लक्षांत येईल.

माजी प्रशस्य सचिव यांनीं इतर वृत्त या शीर्षकाखालीं रा. ब. मोरेश्वर विश्वनाथ प्रधान यांनीं चिंचणकर मिळकतीच्या विश्वस्ताच्या जागेचा राजिनामा कां दिला, याचीं जीं कारणें दिलीं आहेत, त्यांपैकीं एक अक्षरही स्वतः रावबहादुर यांनीं श्री. खरे, करंदीकर, पुरंदरे व देव यांच्याकडे राजिनाम्यासंबंधीं जें पत्र लिहिलें आहे, त्यांत लिहिलेलें नाहीं. सन १९३३ सालीं “ श्री साईबाबा ऑफ शिरडी ” या स्वतः लिहिलेल्या इंग्रजी पुस्तकाच्या २६ व्या पानावर या मिळकतीसंबंधानें खुद्द रावबहादुरांनीं जे उद्गार काढले आहेत, त्या रावबहादुरांच्या मुखांतून माजी प्रशस्य सचिवांनीं रावबहादुरांच्या राजिनाम्याबद्दल दिलेलीं कारणें निघणें संभवनीय दिसत नाहीं. इतक्यावर यांत सत्य काय आहे, तें बाबांनाच माहीत.

श्री. देव हे चिंचणकर मिळकत व शिरडी संस्थान या दोन्ही ठिकाणचे विश्वस्त असल्यामुळें संस्थानच्या छोटया सभेंत कर्जफेडीची, वसुलाची व कोर्टकामाची सविस्तर हकीकत वेळोवेळीं सर्वांना सांगत असत. रावबहादुर प्रधान व देव हे चिंचणकर मिळकतीचे सहविश्वस्त होते. करितां रावबहादुरांनीं हिशोबाची मागणी केल्यावर देवांना ती कधींच नाकारतां आली नसती ह्याची जाणीव देवांना पूर्णपणें होती, व आहे.

श्रावण कृ. १२,<br>
गुरुवार शके १८५९,<br>
ठाणें.<br>
ता. २-९-३७

बाबांचें बाळ

# गेले एप्रिलमधील आमचेवरील साईबाबांनीं निवारलेलें अरिष्ट

## मुंबई येथील एस्प्लेनेड पोलिस कोर्टांत

**सुंदरराव दिनानाथ नवलकर** फिर्यादी

वि.

**रामचंद्र आर. सामंत** आरोपी

आरोप इं. पि. कोड कलमें
५०४ व ५००
बेअदबी व बदनामी

सर होरमझदियार पी. दस्तुर, नाइट.
चीफ प्रेसीडेन्सी मॅजिस्ट्रेट, मुंबई
यांजकडे.

महाराज,

मी एक जमीनदार आहें व बोरीवलींत माझ्या जमिनी आहेत. मी तालुका उत्तर साष्टी लोकलबोर्डाचा व्हाइस प्रेसिडेंट सुद्धा होतों व प्रिन्सेस-स्ट्रीट येथें माझ्या स्वतःच्या घरांत रहातों.

मी साईबाबा शिरडी संस्थानच्या शिरडी संस्थान कमिटीचा गेलीं सात वर्षे ऑनररी सेक्रेटरी आहें. आरोपी हा १ नवंबर १९३६ पासून ऑनररी ट्रेझरर आहे.

ऑनररी सेक्रेटरी या नात्यानें मला हिशेबांतील कांहीं गैर व्यवस्था उघडकीस आणावी लागली, आणि आरोपीस व त्याचे पक्षास हें आवडलें नाहीं म्हणून तो माझ्याशीं दुष्ट बुद्धि धरतो.

ता. ६ जानेवारी १९३७ रोजीं डिसेंबर १९३६ च्या संस्थानच्या हिशेबाच्या दोन नकला आरोपी यास पाठविल्या, त्यांत रु. ६३–२–९ शिल्लक दाखविली होती, व ती रक्कम इंपीरियल बँकेंत भरली होती. असें दिसून येतें कीं जानेवारी १९३७ सालीं ओढलेल्या शिलकेच्या रकमेच्या नोंदींत लिहितांना चूक घडली व ती रक्कम रु. ६३-२-९ चे ऐवजीं रु. ६२-२-९ अशी दाखविली गेली. ता. २६-१-३७ रोजीं आरोपीनें परत पाठविलेल्या हिशेबाचे नकलेवर पुढें आणलेल्या ( allged ) एक रुपयाच्या तुटीबद्दल प्रश्न विचारला होता.

ही नक्कल हातीं येतांच ता. १-२-३७ चें पत्र मी आरोपीस लिहिलें आणि जानेवारी १९३७ चे हिशेब देखील सादर केले व म्हटलें कीं ती नोंद हस्तदोषामुळें घडली आहे. वरील माहिती दिली असून देखील आरोपीनें ता. २-२-३७ रोजीं मला एक पत्र लिहून त्यांत त्यानें खालील माझी बदनामी व बेअदबी करणारें विधान केलें होतें:—

I have come to confirm my opinion to regard this deficiency of one rupee as wrongful user ' वापरलें ' of Sansthan Funds by the Hon. Secretary "

" ही एक रुपयाची घट म्हणजे ऑ. चिटणीस यांचेकडून संस्थान फंडाचा दुरुपयोग ( " वापरले " ) असें मानण्याबद्दलचें माझें मत मला कायम करावें लागत आहे. "

आरोपीनें सदर पत्र ता. ३-२-३७ रोजीं स्वतः माझे घरीं मला आणून दिलें. माझी फार बेअदबी झाली असें मला वाटलें व खोटया

विधानांबद्दल मला त्रास झाला ( annoyed ). ता. ६-२-३७ रोजीं माझ्या वकिलामार्फत मी आरोपीस पत्र लिहून आपले शेरे परत घेण्याबद्दल आव्हान दिलें. ता. ११-२-३७ रोजीं आरोपीनें उत्तर दिलें कीं त्यानें ते शब्द वापरले; पण ते मला सतवाण्याकरितां (tease ) वापरले होते. ता. १९-२-३७ रोजीं वकिलमार्फत मीं पुनः लिहिलें. व आपले शेरे मागे घेण्यासाठीं आव्हान दिलें; पण त्यानें अजूनपर्यंत तसें केलें नाहीं.

म्हणून मी आरोपीवर बेअदबीचे व बदनामीचे गुन्ह्यांचा (Insult & Defamation) आरोप करतों व त्याचे विरुद्ध खटला चालविण्याची विनंती करितों व वांद्रा येथील फर्स्ट क्लास रेसिडेंट मॅजिस्ट्रेट मार्फत बजावणी करण्याची विनंती करितों.

( सही ) **सुंदरराव दिनानाथ नवलकर**

मुंबई येथें प्रतिज्ञेवर ता. १३ मार्च १९३७ रोजीं

माझे समोर

( सही ) **एच. पी. दस्तुर**

चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट, मुंबई

सुंदरराव दिनानाथ नवलकर यांस तपासलें:—

या बाबतींत मला आणखी तपासणी करावीशी वाटते म्हणून नोटीसा काढण्याचा ठराव करतों.

( सही ) **एच. पी. दस्तुर** १३–३–३७

फिर्यादीतर्फे विजयकर

जाब देणारतर्फे खैराझ

## हुकूम

मुळींच जर कांहीं आरोप असला तर तो बदनामीचा असावयाला पाहिजे होता; परंतु पत्र खुद्द फिर्यादीचे हातीं दिल्यामुळें आणि म्हणून त्याची प्रसिद्धि होत नाहीं ही फिर्यादीचे मार्गांतली अडचण त्यास जाणवल्यामुळें फिर्यादीनें कलम ५०४ खालीं आरोप आणण्याचा प्रयत्न केला. पत्रव्यवहारावरून स्पष्ट दिसतें कीं, गुन्ह्याचा उद्देश नव्हता आणि कलम ५०० अगर ५०४ यापैकीं कोठल्याही कलमाखालीं गुन्हा दाखवितां येत नसलेमुळें मी फिर्याद काढून टाकतों. नोटीस रद्द केली आहे.

(सही) **एच. पी. दस्तुर**
२३–४–३७

---

## वाचकांस विनंति

माजी संपादक श्री. नवलकर यांजकडून वर्गणीदारांची यादी (लिस्ट) न मिळल्यामुळें सर्व भक्तांस हा अंक पाठविला आहे. वर्गणीदार होणें नसल्यास तसें संपादक यांस खालील पत्त्यावर पत्रानें कळवावें. पंधरा दिवसांचे आंत असें न कळविल्यास दुसरा अंक व्ही. पी.नें पाठविला जाईल. त्याचा कृपेनें स्वीकार व्हावा. कळावें.

**रामचंद्र रामकृष्ण सामंत**
४५ टर्नर रोड, वांद्रें (मुंबई नं. २०)

# वर्गणीदारांकरितां

१ श्रीसाईलीलेचा वर्षारंभ चैत्र महिन्याच्या अंकापासून आहे. नवीन वर्गणीदारांस वर्षारंभापासून अंक घ्यावे लागतील.

२ पत्ता बदलणें झाल्यास लगेच आम्हास कळवावें. बदललेला पत्ता न कळविल्यामुळें कित्येक वेळां अंक गहाळ होतात.

३ अंकासंबंधीं पत्रव्यवहार आमच्याकडे करावा.

४ लेखासंबंधीं पत्रव्यवहार संपादक व प्रकाशकांकडे करावा.

# वार्षिक वर्गणी

वार्षिक वर्गणी टपालखर्चासह मनिऑर्डरीनें आगाऊ रु ३।= व्ही. पी. नें रु. ३॥, फुटकळ अंक ।=, मागील अंकास शिल्लक असल्यास ॥-

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला**

# लेखकांकरितां

१. श्रीसाईलीलेंत प्रसिद्धीसाठीं पाठविलेला लेख अथवा कविता कागदाच्या एका बाजूवर, मार्जिन सोडून, सुवाच्य बालबोध लिपींत असावी. पेन्सिलीनें किंवा कागदाच्या दोन्ही बाजूंस लिहिलेला मजकूर छापण्यास फार त्रास पडतो.

२. लिखाणासोबत पूर्ण नांव व पत्ता दिला पाहिजे. नांव प्रसिद्ध न करतां टोपण नांवाखालीं प्रसिद्धि द्यावयाची असल्यास त्याप्रमाणें कळवावें.

३. लेख अथवा कविता हातीं आल्यानंतर १ महिन्यांत पसंति अगर नापसंति कळविली जाईल. पसंति कळविल्यानंतर, आम्हाला कळविल्याशिवाय लेखकांनीं तो मजकूर दुसरीकडे छापविण्यास देऊं नये.

४. लेखांत योग्य तो फेरफार करण्याचा अधिकार आमच्यांकडे राहील. येईल तसा शब्दशः प्रसिद्ध करण्याची हमी आम्ही घेत नाहीं.

५. लेखासोबत पुरेसें पोस्टेज आल्यास, नापसंत लेख परत करूं.

प्रकाशक, **श्रीसाईलीला**

दक्षिण प्राइझ कमिटीनें बक्षिस दिलेला व केसरी, चित्रमयजगत्, ज्ञानप्रकाश, विविधज्ञानविस्तार, व रत्नाकर वगैरे वृत्तपत्रें व मासिकांनी उत्कृष्ट अभिप्राय दिलेला असा संतकवि ह. भ. प. श्री दासगणूमहाराज यांनी नवीन टिकेसह व प्रोफेसर श्री. नी. वाटेकर, M. A., LL. B. यांनी प्रस्तावना लिहिलेला नवीन ग्रंथ

**श्री पासष्टी-भावार्थ-दीपिका**

हा नरेंद्र बुक डेपो, दादर, मुंबई येथें मिळेल.

कापडी प्रत १० आणे साधी प्रत ८ आणे,

**सांडू ब्रदर्स**

ओरिजिनल

**ब्राह्मी तेल**

मेंदूचे सर्व विकारांवर

**ख र्जु रा स व**

दमा, खोकला, व क्षय यांवर

**महारास्नादि काढा योगराजगुग्गुळ**

सर्व प्रकारचे वातविकारांवर

**द. कृ. सांडू ब्रदर्स** आर्यौषधि-कारखाना. चेंबूर-मुंबई.

हें पुस्तक श्रीलक्ष्मी-नारायण छापखाना, ३६४ ठाकुरद्वार, मुंबई येथें रामचंद्र काशीनाथ तटणीस यांनी छापून रामचंद्र रामकृष्ण सामंत यांनी ४५ टर्नर रोड, वांद्रें (मुंबई २०) येथें प्रसिद्ध केलें.